रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक २१
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



## अंतरंग


अलिबाग तालुक्यातील शेती खाऱ्या पाण्याच्या विळख्यात/२

पळसदरी येथे अपघातात तरुणीचा जागीच मृत्यू/५

रायगड जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत मानव पटेल प्रथम/८


## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचा 'जेन-झी'शी संवाद



**मुंबई :** शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक गोष्टी करता येऊ शकतात, मात्र हे सर्व करताना समाजात फूट पाडण्यासाठी नव्हे, तर सर्वसंमती निर्माण करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. जेन-झीबद्दल बोलायचे झाल्यास संवाद होणे आवश्यक आहे, असे सांगत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी गुरुवारी (दि.६) मुंबईतील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर येथे जेन झी आणि जेन अल्फा युवांशी संवाद साधला. आम्ही त्यांच्या वयाचे होतो तेव्हा आमच्या पिढीचा स्वभाव वेगळा होता. आजच्या काळात प्रत्येक बाजूचा विचार केला जातो. प्रत्येकाची पाहण्याची दृष्टी वेगळी असल्याने एका विषयाचे नवे पैलू समोर येतात. त्यामुळे संवाद आणि विचारविनिमय लोकशाहीत आवश्यक आहे. त्यातून अनेक गोष्टींवर मार्ग निघतो, असे सरसंघचालक मोहन भागवत यांनी नमूद केले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक योगदान प्रेरणादायी -आमदार रविशेठ पाटील





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भागुबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजच्या मूट कोर्टचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवेला प्राधान्य देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर हे एक अनमोल हिरा आहेत. त्यांनी उभे केलेले कार्य आणि निर्माण केलेली सामाजिक बांधिलकी हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख आहे. त्यांची दूरदृष्टी, ध्येयधोरण आणि कर्तव्यदक्ष शैक्षणिक योगदानातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने केवळ पनवेल परिसरातच नव्हे, तर रायगड, नवी मुंबई, ठाण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक मिळविला आहे. म्हणूनच रामशेठ यांचे या क्षेत्रातील योगदानही प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार राज्याचे माजी मंत्री तथा पेणचे विद्यमान आमदार रविशेठ पाटील यांनी काढले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे मुख्य प्रशासकीय कार्यालय आणि भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या भव्य मूट कोर्टचे उद्घाटन बुधवारी (दि.५) आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास आमदार महेश बालदी, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, शकुंतला ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, रायगड जि.प.चे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, पं.स. सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, महापालिका सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समितीचे बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, संस्थेचे संचालक व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धनराज विसपुते, जी.के. गुजर चॅरिटेबल ट्रस्टचे व्हाईस चेअरमन इंद्रजीत गुजर, वीरेंद्र गुजर, संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, संचालक अनिल भगत, संजय भगत, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, ॲड. राहुल घरत, स्वप्नील ठाकूर, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, वैभव देशमुख, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ.एस.के.पाटील, बीसीटी कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी शिक्षणमहर्षी डॉ.डी.वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. (पान २ वर..)

## अडीच तास ताटकळल्यानंतर 'सुवर्ण'वीर 'राज'भेटीविना माघारी

**नाशिक :** ग्लासगो येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत महाराष्ट्रातील नाशिक येथील क्रीडापटू दिलीप गावित याने पुरुषांच्या १०० मीटर टी४७ शर्यतीत सुवर्णपदक पटकाविले होते. दरम्यान, दिलीप आणि त्याचे प्रशिक्षक वैजनाथ काळे गुरुवारी (दि.६) मनसेप्रमुख राज ठाकरे यांना भेटण्यासाठी आले होते, मात्र अडीच तास ताटकळल्यानंतरही भेट न झाल्याने वैतागून ते माघारी परतले.

दिलीप गावित आणि त्याचे प्रशिक्षक वैजनाथ काळे हे राज ठाकरे यांना भेटण्यासाठी नाशिक येथील विश्रामगृहावर नियोजित वेळेत पोहचले, मात्र बराच वेळ बसून राहिल्यानंतरही भेट होत नसल्याने भेटायचे नव्हते तर बोलावले कशाला होते, असा संताप व्यक्त करत गावित व प्रशिक्षकांनी परतीची वाट धरली. यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघेही नाराज होऊन निघून गेले.

## राज्यातील एक लाख ६० हजार गोविंदांना १० लाखांचे विमाकवच

**मुंबई : प्रतिनिधी**



दहीहंडी उत्सवाच्या काळात मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त होणाऱ्या गोविंदांना आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यंदाच्या दहीहंडी उत्सवासाठी राज्यातील तब्बल एक लाख ६० हजार गोविंदांना १० लाख रुपयांपर्यंतचे मोफत विमा संरक्षण देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

मानवी मनोरा कोसळून गोविंदाचे दोन्ही डोळे अथवा दोन अवयव निकामी झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांचे आर्थिक संरक्षण दिले जाईल. एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास पाच लाख रुपये आणि कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास विमा पॉलिसीतील निश्चित टक्केवारीनुसार मदत मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय जखमी गोविंदांवर रुग्णालयात वैद्यकीय उपचार करावे लागल्यास प्रत्यक्ष उपचाराचा खर्च अथवा जास्तीत जास्त एक लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय कवच शासनाकडून दिले जाणार आहे.






## आमदार प्रशांत ठाकूर यांचा समाजोपयोगी वाढदिवस

### विविध योजनांच्या लाभाचे वाटप; उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्यांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल पंचायत समितीच्या सेस फंडातून आणि शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून लाभार्थींना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गुरुवारी (दि. ६) लाभाचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

पं.स.च्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जि.प.अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पं.स. सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्यासह जि.प. व पं.स. सदस्य, नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

यावेळी विविध विभागातील योजनांच्या लाभाचे वाटप करण्यात आले. त्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत एकूण दोन कोटी ४९ लाखांचा भरीव निधी देण्यात आला. दिव्यांग योजनेंतर्गत ग्रामीण भागातील दिव्यांग बालकांना पंचायत समिती सेस फंडातून भरीव अर्थसहाय्य, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या योगदानातून प्रत्येक बालकाला ११ हजार रुपये, तर सभापती रंजना वास्कर यांनी पाच महिन्यांचे मानधन २६ दिव्यांग बालकांना दिले.

कृषी विभागामार्फत लाभार्थींना ताडपत्री तसेच फवारणी यंत्राचे वाटप करण्यात आले. समाज कल्याण विभागामार्फत पं.स. सेस फंडातून प्रत्येकी पाच स्पीकर सेट, खुर्ची सेट, बेंजो सेट आणि चार भांडी सेटचे वाटप केले गेले. आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीतून तालुक्यातील चार ग्रामपंचायतींना पाच घंटागाड्यांचे वाटप करण्यात आले. (पान २ वर..)

## 'डोह'कार श्रीनिवास कुलकर्णी यांचे निधन

**पुणे : प्रतिनिधी**

ज्येष्ठ साहित्यिक, 'डोह'कार म्हणून ओळखले जाणारे श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे गुरुवारी (दि. ६) दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. 'डोह' या ललित लेखसंग्रहामुळे त्यांना 'डोहकार' ही ओळख लाभली.

फेब्रुवारीमध्ये खुब्याचे हाड मोडल्याच्या त्रासातून श्रीनिवास कुलकर्णी बरे झाले होते, मात्र त्यानंतर त्यांची प्रकृती क्षीण होत गेली. गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास निवासस्थानी त्यांची प्राणज्योत मालवली. 'डोह', 'सोन्याचा पिंपळ', 'पाण्याचे पंख' आणि 'कोरडी भिक्षा' यांसारख्या साहित्यकृतींतून ललित लेखनाची 'मौज' अनुभवताना वाचकांना समृद्ध करण्याचे काम त्यांनी केले. अर्धशतकाहून अधिक काळ साहित्यसेवा करणारे व्रतस्थ लेखक काळाच्या पडद्याआड गेले आहेत.

## पनवेलमध्ये उद्या महारोजगार मेळावा

- ५०००हून अधिक रोजगाराच्या संधी
- ६०पेक्षा जास्त कंपन्यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्लेसमेंट सेलतर्फे भव्य मेगा जॉब फेअरचे आयोजन संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय कॅम्पसमध्ये शनिवारी (दि.८) सकाळी ९ वाजल्यापासून करण्यात आले आहे.

या जॉब फेअरमध्ये बँकिंग, फायनान्शियल सर्व्हिसेस, इन्शुरन्स, आयटी, मॅन्युफॅक्चरिंग, फार्मास्युटिकल्स, इंजिनिअरिंग आणि सर्व्हिस क्षेत्रातील ६०हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी होत आहेत. यामध्ये एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस, लिशिअस, आयडीबीआय इनटेक, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, क्वेस्ट कॉर्प, ओव्हन्स कॉर्निंग, टाटा एआयए, झेप्टो, सदरलँड, मुथूट फायनान्स, व्ही-एन्शुअर यांसारख्या कंपन्यांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे उमेदवारांची भरती केली जाईल. हा उपक्रम सर्व स्तरांतील उमेदवारांसाठी खुला व मोफत आहे. (पान २ वर..)



**पनवेल :** येथील जुन्या भाजी मार्केटच्या विकासाबद्दल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत गुरुवारी चर्चा करण्यात आली. या बैठकीस नगरसेवक परेश ठाकूर, राजू सोनी, सुमित झुंजारराव, माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त वैभव विधाते आणि बालाजी ट्रस्टचे विश्वस्त उपस्थित होते.




# करंजा बंदरासाठी अत्याधुनिक यंत्रणेसह अनुभवी मनुष्यबळाचा वापर करावा –मुख्यमंत्री

## दुसऱ्या टप्प्यात पायाभूत सुविधांच्या उभारणीस मिळणार गती

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा मत्स्य बंदराच्या प्रकल्पातून वार्षिक ४,५०० मेट्रिक टन मत्स्य उत्पादन हाताळण्याची क्षमता निर्माण होणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यातील कामांसाठी १४९ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली होती. मंजूर कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने (एमएमबी) पूर्ण केली असून उर्वरित कामे गतीने होण्यासाठी अनुभवी तंत्रज्ञ आणि आधुनिक यंत्रणेचा वापर करावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व्यय अग्रक्रम समितीची बैठक झाली. यावेळी विविध विकास प्रकल्पाबाबत चर्चा झाली. मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन. यांनी करंजा बंदराच्या विकासाबद्दल माहिती सादर केली. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त (व्यय) विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, यासह विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव आणि प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, करंजा मत्स्य बंदर विकास प्रकल्प ५.२३ हेक्टर क्षेत्रावर विकसित करण्यात येत असून, या बंदरावर ६,६०० मच्छीमारांना सुविधा उपलब्ध होणार आहे. ही कामे पूर्ण करण्यास गती देण्यात यावी. पहिल्या टप्प्यात या प्रकल्पासाठी केंद्र व राज्य सरकारने ५० : ५० या प्रमाणात हिस्सा आहे. आतापर्यंत १३६.३९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. राज्य शासनाकडून ७४.९० कोटी रुपये असा निधी तर केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून १४ कोटी रुपये, केंद्रीय नौवहन मंत्रालयाकडून ६०.९० कोटी रुपये मंजूर करण्यात आला आहेत. यामध्ये मंजूर २४ कामांपैकी १३ पूर्ण झाली आहेत.

करंजा मत्स्य बंदराचा विकास पूर्ण झाल्यानंतर मच्छीमारांना आधुनिक सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार आहे. प्रकल्पांतर्गत आत्तापर्यंत अतिरिक्त क्वे वॉल, प्रवेश जलमार्गाचे रुंदीकरण, बोट पार्किंग, कॉँक्रीट पृष्ठभाग, चार आधुनिक मासळी लिलाव हॉल, मत्स्य प्रशासन कार्यालय, फिशिंग गिअर शेड, जाळी दुरुस्ती शेड, मच्छीमार विश्रांतीगृह, रेस्टॉरंट, रेडिओ कम्युनिकेशन स्टेशन, गार्ड हाऊस, कंपाऊंड वॉल आणि सुशोभीकरण आदी अत्याधुनिक सुविधा विकसित करण्यात येत आहेत.

उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाकडे (एमएफडीसी) प्रस्ताव प्राप्त झाला असून, करंजा मत्स्य बंदर विकासाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठी १५१.२९ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. शासनाने या प्रस्तावात आवश्यक सुधारणा करून पुनर्सादर करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. या प्रकल्पांतर्गत ३७० रनिंग मीटर अतिरिक्त क्वे वॉल उभारण्यात येणार असून, प्रवेश जलमार्ग रुंदीकरण तसेच बोट पार्किंगची अतिरिक्त सुविधा विकसित करण्यात येणार आहे. मच्छीमारांसाठी चार आधुनिक मासळी लिलाव हॉल, मत्स्य प्रशासन कार्यालय, दोन फिशिंग गिअर शेड, दोन जाळी दुरुस्ती शेड, मच्छीमार विश्रांतीगृह, रेस्टॉरंट, रेडिओ कम्युनिकेशन स्टेशन, गार्ड हाऊस, कंपाउंड वॉल उभारण्यात येणार आहेत. बंदर परिसरात कॉँक्रीट पृष्ठभाग विकसित करून वाहतूक व माल हाताळणी अधिक सुलभ होणार आहे.

# अलिबाग तालुक्यातील शेती खाऱ्या पाण्याच्या विळख्यात!

## ३१ वर्षांपासून पाच हजार हेक्टर जमीन पडिक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील खारोपट परिसरातील सुमारे पाच हजार हेक्टर सुपीक शेती गेल्या ३१ वर्षांपासून खाऱ्या पाण्याच्या शिरकावामुळे नापीक झाली असून, हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे योग्य नुकसानभरपाई, कायमस्वरूपी संरक्षण उपाययोजना आणि शेती पूर्ववत करण्याची मागणी केली आहे.

डावली, रेवस, कावळे, बेलवडे, चरी, कोरलाई पाडा, माणकुळे, नागरेश्वर, मांडवदरा, फोफेरी, वाघरण , खारघोडे तसेच सोनकोठी व वरकोठी परिसरातील शेती १९८६ पासून खाऱ्या पाण्याच्या विळख्यात अडकली आहे. समुद्राच्या भरतीच्या वेळी खारे पाणी थेट शेतात घुसल्याने हजारो हेक्टर क्षेत्राची उत्पादनक्षमता संपुष्टात आली आहे.शेतकऱ्यांच्या मते, खारबंदिस्तीची योग्य दुरुस्ती आणि देखभाल वेळेत झाली असती, तर ही परिस्थिती टाळता आली असती. मात्र संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे सुपीक जमीन ओसाड झाली असून अनेक शेतकऱ्यांना शेती सोडून मजुरीचा मार्ग स्वीकारावा लागला आहे.



दरम्यान, स्थानिक शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून खारेपाट भागातील शेती वाचविण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला आहे. खाऱ्या पाण्यामुळे उद्ध्वस्त झालेली शेती पुन्हा हिरवीगार करण्यासाठी शासनाने दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

– बाधित पाच हजार हेक्टर क्षेत्राचे तातडीने संयुक्त शासकीय सर्वेक्षण करावे.

– ३९ वर्षांपासून नापीक झालेल्या जमिनीचे मूल्यांकन करून नुकसानभरपाई द्यावी.

– नवीन खारबंदिस्ती, संरक्षण बंधारे व स्लुईस गेट उभारावेत.

– बाधित गावांसाठी विशेष आर्थिक मदत व पुनर्वसन पॅकेज जाहीर करावे.

– क्षारनिर्मूलन करून शेती पुन्हा लागवडीयोग्य करावी.

– जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून आवश्यक कारवाई करावी.

रोजगारनिर्मिती आणि किनारपट्टी संरक्षणासाठी दीर्घकालीन योजना राबवाव्यात.

पान १ वरुन

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक योगदान प्रेरणादायी –आमदार रविशेठ पाटील

आमदार रविशेठ पाटील यांनी पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा विशेष गौरव केला. ते म्हणाले, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. समाजाच्या सेवेसाठीच त्यांचा जन्म झाला आहे. त्यांनी उभारलेली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देणारी आणि त्यांच्या कर्तृत्वाला दिशा देणारी संस्था आहे. या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा, कला आणि विविध क्षेत्रांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकविला आहे. राष्ट्रकुल स्पर्धांपासून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डपर्यंत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे संस्थेच्या गुणवत्तापूर्ण कार्याचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षणासोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नेतृत्व आणि संस्थेची कार्यसंस्कृती आहे. त्यामुळे या संस्थेची भरारी ही रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे.

राज्यात अनेक शैक्षणिक संस्था आहेत, मात्र संस्था उभी करणे आणि ती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचविणे यात मोठा फरक आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने हा फरक आपल्या कामातून सिद्ध केला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचा पारदर्शक, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख कारभार सुरू असून सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होत आहे, असे सांगून आमदार रविशेठ पाटील पुढे म्हणाले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या समाजसेवेचा आणि विकासाच्या विचारांचा वारसा त्यांचे पुत्र आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर समर्थपणे पुढे नेत आहेत. सत्तेची अपेक्षा न ठेवता समाजाच्या हितासाठी, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आणि परिसराच्या विकासासाठी ठाकूर कुटुंबीय सातत्याने काम करीत आहेत. त्यामुळे या कुटुंबाचे सामाजिक योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे, असेही त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

### सर्वांच्या सहकार्याने संस्थेची प्रगती –लोकनेते रामशेठ ठाकूर

यावेळी अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या आजवरच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेत संस्थेच्या प्रगतीचे श्रेय सर्व सहकारी, शिक्षक, विद्यार्थी, पालक, हितचिंतक आणि युवकांच्या सामूहिक योगदानाला दिले. हे सर्व माझ्या एकट्याचे काम नाही. सर्वांच्या सहकार्यामुळेच काम करण्याचा हुरूप, ऊर्जा आणि ताकद मिळाली. सहकाऱ्यांचे सहकार्य आणि युवकांची ताकद हीच संस्थेच्या प्रगतीची खरी शक्ती आहे, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

संस्थेने आजवर अफाट प्रगती साधत शिक्षण क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला असून संस्थेच्या विविध विद्यालयांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच अनेक यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत. केंद्र व राज्य शासनाचे विविध पुरस्कार संस्थेच्या विद्यालयांना प्राप्त झाले आहेत. हे यश विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि हितचिंतक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित असल्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले.

कर्मवीर अण्णा आणि जनार्दन भगतसाहेबांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून संस्थेची वाटचाल सुरू आहे. त्यांच्या आशीर्वादाने समाजातील प्रत्येक घटकाला दर्जेदार शिक्षण, आधुनिक सुविधा आणि उत्तम शैक्षणिक वातावरण देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सातत्याने केला जात आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने सक्षम आणि दूरदृष्टीचे नेतृत्व, तर महाराष्ट्राला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने विकासाभिमुख नेतृत्व लाभले असल्याचे नमूद करताना त्यांच्या नेतृत्वाखाली देश आणि महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

संस्थेच्या शिक्षणाचा दर्जा, गुणवत्ता आणि कार्यपद्धतीवर समाजाचा दृढ विश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळेच विद्यार्थी संस्थेच्या नावावर विश्वास ठेवून प्रवेश घेत आहेत, हीच आपल्या कार्याची खरी पावती आहे, असे त्यांनी सांगितले.

यापुढील काळातही संस्थेच्या वाटचालीत प्रेम, आपुलकी, विश्वास आणि सहकार्याचे वातावरण कायम ठेवत शिक्षण क्षेत्रात नवनवीन आदर्श निर्माण करण्याचा संकल्प लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला तसेच संस्थेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीप्रति कृतज्ञता व्यक्त करत सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

### संस्थेने गुणवत्तेचा ठसा उमटवला –आमदार प्रशांत ठाकूर

प्रास्ताविकपर भाषणात बोलताना संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेने विविध क्षेत्रांत अनेक मानांकने प्राप्त करत सातत्याने आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. संस्थेच्या सर्व शाखांमधून दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याने संस्थेला राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कार आणि सन्मान मिळाले आहेत. दर्जेदार शिक्षणासोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही संस्था उल्लेखनीय कार्य करत आहे. संस्थेचे प्रशासकीय कार्यालयही त्याच दर्जाचे आणि आधुनिक असावे, अशी संकल्पना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मांडली होती. त्यानुसार या प्रशासकीय कार्यालयाची उभारणी करण्यात आली आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली संस्था वेगाने वाटचाल करत असून १३ मे रोजी उलवे येथे झालेल्या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले.

यावेळी शिक्षण, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांचे आभार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक व नगरसेवक परेश ठाकूर यांनी मानले.

### मंत्री चंद्रकांत पाटील यांचा गौरव संदेश

पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील यांचे निधन झाल्याने त्यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहणे आवश्यक असल्याने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु त्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्याचा चित्रफित संदेशाद्वारे गौरव करीत शुभेच्छा दिल्या. ही चित्रफीत यावेळी प्रदर्शित करण्यात आली.

ना. चंद्रकांत पाटील यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, नमस्कार माझे परममित्र आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कुठल्याही कार्यक्रमाला त्यांनी निमंत्रण दिल्यानंतर मी नाही म्हणू शकत नाही; त्याप्रमाणे आजच्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यक्रमाला मी हो म्हटले, पण देशातलं एक मोठं नाव शिक्षण क्षेत्रातलं डॉ.डी.वाय. पाटील यांचे काल अचानक निधन झाले. शिक्षण, सहकार, आरोग्य क्षेत्रातील त्यांचे भरीव व मोठे असून देशाच्या तीन राज्यांचे ते राज्यपाल राहिले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मी ज्या कोल्हापूरचा त्या कोल्हापूरचे ते आहेत. त्यामुळे त्यांच्या अंत्यसंस्काराला मला पोहचावेच लागेल आणि म्हणून फार आधीपासून हो म्हणूनही मला अचानक कार्यक्रमाला उपस्थित राहता येत नाही आणि त्यामुळे मी या संदेशातून माझ्या भावना व्यक्त करतो आहे.

कार्यक्रमाला उपस्थित माजी खासदार रामशेठ ठाकूर यांना मी एक राजकीय नेता म्हणून ओळखत होतो, पण जसे जसे मी त्यांच्याजवळ गेलो तर माझ्या लक्षात आले की, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे काम डोंगराएवढे मोठे आहे. असे आमचे लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, विद्यार्थी आणि उपस्थित सर्व मान्यवरांना माझा सप्रेम नमस्कार! संस्थेच्या या कार्यक्रमांमध्ये आज खूप गोष्टी होणार आहेत. विद्यार्थ्यांचे कौतुक, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबद्दलची भविष्यातील काही दिशा मांडली जाणार आहे. स्व. जनार्दन भगतसाहेबांचा 'स्वतः घडा आणि दुसऱ्यांना घडवा' हा संदेश आणि 'विद्या विनयेन शोभते' हे बोधवाक्य आजही या संस्थेच्या प्रत्येक उपक्रमातून अधोरेखित होते. माजी खासदार रामशेठ ठाकूर हे विद्या विनयेन शोभते याचे मोठे प्रतिकच आहे, त्यांच्या अंगी किती नम्रता आहे. १९९२मध्ये सुरू केलेल्या या संस्थेने शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचे उल्लेखनीय कार्य केले आहे. १८ शाखांतून २१ हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. हजारावर अधिक शिक्षक व कर्मचारी ज्ञानदान करीत आहेत. ही वाटचाल संस्थेवर समाजाचा विश्वास असल्याची साक्ष आहे. स्पर्धा खूप वाढतेय, त्यातून एवढे विद्यार्थी संख्या टिकवून आहे आणि हे सोपे नाही. नॅकचे ए प्लस प्लस मानांकन, विविध राष्ट्रीय पुरस्कार, आधुनिक शैक्षणिक सुविधा देणारी ही संस्था नवी मुंबई आणि रायगड परिसरातील एक विश्वासार्ह शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. विशेषतः भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाने गेल्या १६ वर्षात साडेसात हजार अधिक विधीज्ञ घडविले आहेत. न्यायव्यवस्था, प्रशासन, कॉर्पेट क्षेत्र आणि सार्वजनिक जीवनात या संस्थेचे विद्यार्थी उल्लेखनीय योगदान देत आहे. मूट कोर्ट, कायदेशीर मदत शिबिरे, संशोधन, इंटरनॅशनल आणि संविधानिक मूल्यांवर आधारित शिक्षण ही महाविद्यालयाची खरी ताकद असून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, कौशल्य संशोधन आणि विकसित करण्यावर भर दिला जात आहे, असे त्यांनी सांगितले.

ना. पाटील पुढे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने उच्च शिक्षण जागतिक दर्जाचे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. अशा परिवर्तनाच्या प्रवासात जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेसारख्या संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. माझ्या प्रिय विद्यार्थ्यांनो, पदवी मिळवणे हे आयुष्याचे अंतिम ध्येय नाही, तर समाजासाठी उपयुक्त, जबाबदार आणि मूल्यनिष्ठ नागरिक बनणे हे शिक्षणाचे खर उद्दिष्ट आहे. संविधानातील न्याय, समता, स्वातंत्र, आणि बंधुत्व जपत आपल्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्रनिर्मितीसाठी करा. जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेच्या सर्व पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! संस्थेने भविष्यातही गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समाजसेवेची परंपरा अधिक उंचीवर न्यावी अशा प्रकारच्या शुभेच्छा देऊ मी माझं बोलणं संपवतो.. जय हिंद, जय महाराष्ट्र!

### अशी आहे संस्थेची वाटचाल

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही रायगड नवी मुंबईतील एक नामांकित शैक्षणिक संस्था असून तिची स्थापना १ जानेवारी १९९२ रोजी झाली. स्व. जनार्दन भगतसाहेबांचे समाजहिताचे विचार, शिक्षणाविषयीची तळमळ आणि त्यांच्या कार्यातून मिळालेली प्रेरणा पुढे नेत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. स्थापनेपासूनच संस्थेने गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक आणि संस्कारक्षम शिक्षणाला प्राधान्य देत शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने वाटचाल केली आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळाच्या प्रवासात संस्थेने शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय विस्तार केला असून आज संस्थेच्या अंतर्गत १८ शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. विविध स्तरांवरील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, आवश्यक शैक्षणिक सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य संस्था सातत्याने करत आहे. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विचारातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आजही आपल्या शैक्षणिक वाटचालीत पुढे जात आहे. स्व. जनार्दन भगतसाहेबांचे विचार आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची दूरदृष्टी यांचा वारसा जपत गुणवत्तापूर्ण शिक्षणातून सक्षम पिढी घडविण्याचे ध्येय संस्थेने कायम ठेवले आहे.

रायगड जिल्ह्यातील वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण लक्षात घेऊन विधी शिक्षणाची गरज ओळखत संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दूरदृष्टीतून शैक्षणिक वर्ष २००९–१०मध्ये श्रीमती भगुबाई चांगू ठाकूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. बार कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता व मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या महाविद्यालयात सुसज्ज इमारत, प्रशस्त वर्गखोल्या, समृद्ध ग्रंथालय व मूट कोर्ट हॉल यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. क्लिनिकल लीगल एज्युकेशन, प्रात्यक्षिकाधारित शिक्षण तसेच न्यायाधीश, ज्येष्ठ वकील आणि कायदेतज्ज्ञांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक कायदेविषयक ज्ञान मिळते. अनुभवी प्राध्यापकवर्गाच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक ज्ञानासोबत आत्मविश्वास, तर्कशक्ती, संवादकौशल्य व सामाजिक बांधिलकी विकसित केली जाते. गुणवत्तापूर्ण व व्यावहारिक विधी शिक्षणातून सक्षम भावी कायदेपंडित घडविण्याचे कार्य महाविद्यालय सातत्याने करत आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा समाजोपयोगी वाढदिवस

आरोग्य विभागातील उत्कृष्ट आरोग्य सेवा देणाऱ्या, समर्पितपणे काम करणाऱ्या आशा सेविका, आरोग्य सेविका व आरोग्य सेवक अशा २० व्यक्तींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, पशुधन विभागाच्या वतीने तालुक्यातील उत्कृष्ट पशुपालकांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या अंगणवाडीताई व मदतनीस यांना उत्तम कामाबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे याच विभाग अंतर्गत तालुक्यातील २५० किशोरवयीन मुलींना स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण देण्यात आले व त्यातील पाच प्रातिनिधीक विद्यार्थिनींना कराटे प्रशिक्षण प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना संबोधताना कार्यक्रमाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पंचायत समितीच्या विविध विभागांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाबाबत समाधान व्यक्त करून पनवेल तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक विभागाच्या योजनांची माहिती होणे, त्याचा लाभ मिळणे यासाठी प्रशासन व पदाधिकारी यांनी संयुक्तपणे प्रयत्न करावे, जेणेकरून तालुक्याचा विकास हे आपले प्रथम प्राधान्य असेल, असे सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी हे राज्य पातळीवर योग्य चर्चा करून तालुक्याच्या विकासाचे प्रश्न सोडवत असल्याने विकासाला वेगळी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पनवेल पंचायत समितीच्या माध्यमातून यापुढे अशाच पद्धतीने विकासाची कामे होत राहतील. सद्यस्थितीत पनवेल तालुक्यातील सर्व घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी आमचे सर्व पदाधिकारी मेहनत घेत असून आज त्याची फलश्रुती आपण पाहत आहात. येणाऱ्या काळात पंचायत समितीच्या सभोवतालच्या परिसरात कोणताही अडथळा राहणार नाही यासाठी मंत्रालय पातळीवर चर्चा करून योग्य मार्ग काढला जाईल.

आमदार महेश बालदी यांनी म्हटले की, आपण समाजाचे देणे लागतो. लोकप्रतिनिधी म्हणून आदिवासी समाजातील लोकांच्या प्रश्नांची गंभीर दखल घेऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू. त्यांच्या प्रश्नसंबंधी वरिष्ठ पातळीवर चर्चा करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करू तसेच पनवेल पंचायत समितीच्या इमारतीच्या सभोवताली येणाऱ्या अडथळ्यांवरदेखील वरिष्ठ पातळीवर चर्चा करून लवकरात लवकर मार्ग काढला जाईल.

जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जिल्हा परिषदेमार्फत आपणास अशा योजनांसाठी व कार्यक्रमासाठी वेळोवेळी सहाय्य केले जाईल, असे सांगून पनवेल तालुक्यातील शेवटच्या माणसापर्यंत विकास पोहचेल या दृष्टीने यापुढे असेच उपक्रम राबवाल, त्यासाठी जिल्हा परिषद कायम आपल्या सहाय्य असेल, असे आश्वस्त केले.

सभापती रंजना वास्कर यांनी सांगितले की, माझ्या कारकिर्दीत पहिला कार्यक्रम हा समाजातील वंचित व गरजू घटकांना योजनांच्या लाभाचे वाटपाने होतोय याचा मला अधिक आनंद वाटतो. मी पदभार स्वीकारल्यापासून ग्रामीण भागातील अनेक शाळांना व गावांना भेटी देऊन दिव्यांग बालकांची संवाद साधला. दिव्यांग बालकांची आर्थिक परिस्थिती व त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष याचा विचार करता अशा बालकांसाठी एक विशेष भरीव तरतूद व वेगळ्या पद्धतीने काम करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी केले. तालुक्यातील शेवटच्या घटकापर्यंत पंचायत समितीच्या माध्यमातून विकास पोहचला पाहिजे या उद्देशाने आमच्यावर सोपवलेली जबाबदारी आम्ही समर्थपणे पार पाडू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पनवेलमध्ये उद्या भव्य रोजगार मेळावा

उमेदवारांना क्यूआर कोड स्कॅन करून मोफत नोंदणी करता येईल. सर्व पदवीधर, डिप्लोमाधारक, दहावी–बारावी उत्तीर्ण व विविध शाखांमधील नोकरी इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने नोंदणी करून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा तसेच मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी सोबत बायोडाटा (रिझ्यूम/सीव्ही)च्या ९ ते १० प्रती आणाव्यात, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील यांनी केले.

**आवश्यक पात्रता**

* शालेय व व्यावसायिक शिक्षण : दहावी उत्तीर्ण, बारावी उत्तीर्ण, आयटीआय, डिप्लोमाधारक तसेच कुशल व अकुशल उमेदवार.

* पदवी व पदव्युत्तर शिक्षण : कला (बीए/एमए), वाणिज्य (बीकॉम/एमकॉम), विज्ञान (बीएससी/एमएससी), मॅनेजमेंट (बीएमएस/बीबीए/एमबीए), इंजिनिअरिंग (बीई/बीटेक), विधी/कायदा (एएलबी/एलएलएम) आणि इंटिरिअर डिझायनिंग.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

## घोटमध्ये रक्तदान, आरोग्य शिबिर आणि छत्री वाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या वाढदिवसाचा आनंद हा समाजाला देऊ शकलो पाहिजे, ही भावना आपल्या मनामध्ये असणे अत्यंत गरजेचे आहे आणि हेच सामाजिक बांधिलकीचे कार्य नगरसेवक नितेश पाटील यांनी आरोग्य शिबिराच्या माध्यमातून उत्तमरित्या पार पाडले, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी घोट येथे केले तसेच आपल्या परिसरातील विविध विकासकामांसाठी ज्या शेतकऱ्यांनी आपली जमीन दिली, त्या शेतकऱ्याला माझा विकास होतोय ही भावना मनामध्ये राहिली पाहिजे. याच दृष्टिकोनातून भारतीय जनता पार्टी सबका साथ, सबका विकास हे ध्येय समोर ठेवून काम करीत असल्याचे मत त्यांनी घोट येथील कार्यक्रमात व्यक्त केले.

पनवेल महापालिका हद्दीतील घोट गावामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर आणि विविध सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. खारघर येथील मेडिकोव्हर हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित आरोग्य शिबिरात नागरिकांची बीएमआय, रक्तदाब, रक्तातील साखर, पल्मोनरी फंक्शन टेस्ट, नेत्र तपासणी, ईसीजी आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या मोफत सल्ल्यासह सखोल तपासणी करण्यात आली. शिबिराचा शेकडो नागरिकांनी प्रत्यक्ष लाभ घेतला.

आरोग्यासोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत कार्यक्रमात सुमारे ६००हून अधिक नागरिकांना छत्रीचे वाटप करण्यात आले. रक्तदान करणाऱ्या ५२ रक्तदात्यांना प्रमाणपत्र आणि रस्ते सुरक्षेचा संदेश देणारे हेल्मेट भेट म्हणून देण्यात आले. स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांच्या अभूतपूर्व प्रतिसादात पार पडलेल्या या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन पनवेल महापालिकेचे नगरसेवक नितेश पाटील यांनी केले होते.

यावेळी भाजपचे खारघर मंडळ अध्यक्ष नगरसेवक प्रवीण पाटील, तळोजा मंडळ अध्यक्ष नगरसेवक दिनेश खानावकर, आयोजक नगरसेवक नितेश पाटील, नगरसेविका विजयश्री पाटील, दीक्षा पाटील, विनोद पाटील, माजी सरपंच हरिदास पाटील, माजी सरपंच नंदू म्हात्रे, नितीन भोईर, भाजप नेते संतोष पाटील, निर्दोष केणी, शुभम बिल्डर्सचे एमडी दिलीप पाटील, माजी सदस्य बाळाराम पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत, वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, श्री. निकम यांसह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगरसेविका सरस्वती काथारा यांच्या पुढाकाराने सप्तश्रृंगी मंदिरात आरोग्य शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रतीक काथारा फाउंडेशन आणि नगरसेविका सरस्वती काथारा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्वरोग निदान शिबिराचे अत्यंत यशस्वी आयोजन करण्यात आले होते. कळंबोली येथील सप्तश्रृंगी माता मंदिर परिसरात हे शिबिर पार पडले. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन चष्म्यांचे वाटप केले तसेच आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून असा सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल नगरसेविका सरस्वती काथारा यांचे विशेष आभार मानले.

या आरोग्य शिबिरामध्ये परिसरातील शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. शिबिरादरम्यान नागरिकांसाठी मोफत मधुमेह तपासणी आणि मोतीबिंदू रुग्णांची विशेष तपासणी करण्यात आली. या तपासणीत पात्र ठरलेल्या मोतीबिंदू रुग्णांवर कळंबोली येथील एम. जी. एम. हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया केली जाणार असून गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटपदेखील करण्यात आले.

नगरसेविका सरस्वती काथारा व प्रतीक काथारा फाउंडेशनच्या पुढाकाराने आयोजित उपक्रमाला स्थानिक नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत आयोजित आरोग्य शिबिराबद्दल परिसरातील नागरिकांनी आणि रुग्णांनी आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी भाजपचे कळंबोली मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक अमर पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, दमयंती भोईर, भाजप नेते अशोक मोटे, नरेश काथारा, निलेश भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# शास्त्रीय गायिका शुभदा पराडकर यांनी सुरेल मैफलीसह केले मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शास्त्रीय गायिका विदुषी शुभदा पराडकर यांच्या शास्त्रीय संगीतावरील मार्गदर्शनपर प्रात्यक्षिक कार्यक्रमाला पनवेल तालुक्यासह परिसरातील युवा व ज्येष्ठ कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शास्त्रीय संगीताच्या विविध पैलूंचे सखोल विवेचन व प्रत्यक्ष सादरीकरणामुळे कार्यक्रम संगीतप्रेमींसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि सुरेल अनुभव ठरला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते विदुषी शुभदा पराडकर यांचा सन्मान करण्यात आला.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी शास्त्रीय गायिका विदुषी शुभदा पराडकर, हभप पं. निवृत्तीबुवा चौधरी, हभप पं. महादेवबुवा शहाबाजकर, वसंतशेठ पाटील, जे. टी. पाटील, पं. उमेश चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर, युवा व ज्येष्ठ कलाकार उपस्थित होते.

विदुषी शुभदा पराडकर यांनी शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत, रागदारी संगीत, विविध सांगीतिक घराणी, स्वरलगाव, रियाज, ताना, तोडे तसेच गायकीतील विविध बारकावे यावर अत्यंत अभ्यासपूर्ण व सखोल मार्गदर्शन केले. आपल्या प्रात्यक्षिक सादरीकरणातून त्यांनी संगीताच्या तांत्रिक अंगासोबतच संगीत साधनेकडे पाहण्याची दृष्टी आणि सातत्यपूर्ण रियाजाचे महत्त्वही अधोरेखित केले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे उपस्थित कलाकारांना शास्त्रीय संगीताच्या साधनेची नवी दिशा मिळाली. कार्यक्रमादरम्यान युवा कलाकारांसह ज्येष्ठ व अनुभवी कलाकारांनी विविध विषयांवर प्रश्न उपस्थित केले. विदुषी शुभदा पराडकर यांनी या प्रश्नांना अभ्यासपूर्ण उत्तरे देत संवाद साधला.

त्यामुळे मार्गदर्शनपर सत्र अधिकच ज्ञानसमृद्ध, संवादात्मक आणि प्रेरणादायी ठरले. उपस्थित कलाकारांनी उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. यावेळी उपस्थित युवा कलाकारांनी पनवेल तालुक्यात अशा प्रकारचे शास्त्रीय संगीताचे मार्गदर्शनपर व प्रात्यक्षिक कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. आमदार प्रशांत ठाकूर आणि पं. उमेश चौधरी यांनी पुढाकार घेऊन असे उपक्रम नियमितपणे राबविल्यास नवोदित कलाकारांना शास्त्रीय संगीताचे योग्य मार्गदर्शन, संस्कार आणि व्यासपीठ उपलब्ध होईल, अशी भावना कलाकारांनी व्यक्त केली.

यावेळी ज्येष्ठ कलाकारांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सांस्कृतिक योगदानाचे विशेष कौतुक केले. भारतीय शास्त्रीय संगीत, कला आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी ते तळमळीने कार्यरत असल्याचे गौरवोद्गार उपस्थितांनी काढले. आमदार प्रशांत ठाकूर यांना निरोगी, यशस्वी आणि दीर्घायुष्य लाभावे तसेच त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याला भविष्यातही अधिक बळ मिळावे, अशा शुभेच्छाही यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या मार्गदर्शनपर प्रात्यक्षिक कार्यक्रमामुळे पनवेल परिसरातील शास्त्रीय संगीतप्रेमी व युवा कलाकारांना नवा उत्साह मिळाला.

सूत्रसंचालन मच्छिंद्र पाटील यांनी समर्पक व प्रभावी शैलीत केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समिती सदस्य विनोद तोडेकर, कृष्णा पवार, नारायण पाटील, जगदीश पाटील आणि पूनम ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजन व समन्वयामुळे हा मार्गदर्शनपर प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# कळंबोलीत शालेय साहित्य वाटप आणि नेत्रतपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुसऱ्यांसाठी जगणे आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाची निरंतर सेवा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी हा गुणधर्म स्वतःमध्ये आत्मसात करावा, असा सल्ला आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोली येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिला. तसेच नगरसेवक विजय खानावकर यांनी माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद आणण्याचा जो स्तुत्य उपक्रम राबवला, त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली परिसरात विविध समाजहिताच्या उपक्रमांचे अत्यंत उत्साही वातावरणात यशस्वी आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेचे नगरसेवक विजय खानावकर यांच्या वतीने गुरुवारी आयोजित या विविध सामाजिक व लोकोपयोगी कार्यक्रमांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना बॅग्सचे वाटप करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या सामाजिक उपक्रमांतर्गत कळंबोली गावातील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग्सचे वाटप करण्यात आले. नवीन शालेय साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला. यानंतर श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात नागरिकांसाठी मोफत नेत्रतपासणी शिबिर आयोजित करून गरजू व ज्येष्ठ नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिराचा परिसरातील शेकडो नागरिकांनी लाभ घेतला. आयोजक नगरसेवक विजय खानावकर यांच्या या उपक्रमांना स्थानिक नागरिक, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि हितचिंतकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**पनवेल : येथील महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत यांचे चिरंजीव रोहित भगत यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन रोहित भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक अनिल भगत हेही उपस्थित होते.**



## बालग्रामला जीवनोपयोगी वस्तूंची मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे संवेदनशील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उपक्रमांना प्राधान्य देण्यात येत आहे. याच भावनेतून महिला मोर्चाच्या पनवेल शहर मंडल अध्यक्षा तथा पनवेल महापालिकेच्या नगरसेविका रुचिता लोंढे-समेळ यांनी बालग्राम, पनवेल येथील अनाथाश्रमाला जीवनोपयोगी वस्तूंची मदत देत सामाजिक बांधिलकी जपली.

वाढदिवसानिमित्त फुले, हारतुरे आणि बॅनरवर अनावश्यक खर्च न करता लोकोपयोगी कामात सहभागी व्हा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत रुचिता लोंढे-समेळ, चिन्मय समेळ, प्राजक्ता पाटील यांनी बालग्रामला भेट देऊन तेथील ४० अनाथ मुलांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन जीवनोपयोगी वस्तूंची मदत केली.

यावेळी बालग्रामचे विनायक पाटील उपस्थित होते. वाढदिवसाचा आनंद केवळ सत्कारापुरता मर्यादित न ठेवता गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्याला दिशा मिळत आहे.

## पनवेल आणि मानसरोवर रेल्वे स्टेशन्सवर एईडी मशीनची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अचानक हृदयक्रिया बंद पडणे ही एक जीवघेणी आपत्कालीन अवस्था असून अशा प्रसंगी प्रत्येक मिनिट अत्यंत महत्त्वाचा असतो. वेळेवर सीपीआर आणि एईडीचा वापर केल्यास रुग्णाचा जीव वाचण्याची शक्यता अनेक पटींनी वाढते. या पार्श्वभूमीवर रिव्हर साईट बी अ‍ॅण्ड जे हॉस्पिटलच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ऑटोमेटेड एक्सटर्नल डिफिब्रिलेटर हे अत्याधुनिक मशीन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ही महत्त्वपूर्ण मशीन पनवेल आणि मानसरोवर रेल्वे स्थानकांवर बसवण्यात येणार आहेत. दरम्यान, रिव्हर साईट बी अ‍ॅण्ड जे हॉस्पिटलतर्फे डॉ. विनय जैस्वाल, डॉ. प्रितीश बाबूल आणि नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते ही मशीन आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. या उपक्रमामुळे रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आपत्कालीन वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाली आहे.



## सेवापूर्तीनिमित्त 'रयत'च्या विभागीय कार्यालयाकडून सागर रंधवे यांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण-कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आणि ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील उपशिक्षक सागर शंकर रंधवे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त संस्थेच्या रायगड विभागीय कार्यालयात त्यांचा सत्कार करून मनपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे आणि सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांनी रोप, स्नेहवस्त्र आणि ग्रंथ भेट देऊन त्यांना यावेळी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, रयत को-ऑपरेटिव्ह बँक, साताराचे संचालक तथा वाशी शाखेचे चेअरमन आणि लाईफ वर्कर किशोर पाटील, रिटघर शाखेचे मुख्याध्यापक कारंडे सर व मुंबईतील प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक उमाकांत जगताप, बिल्डिंग सुपरवायझर विनय म्हात्रे, विभागीय कार्यालयाचे वैभव गावंड आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# जनतेचे हित महत्त्वाचे

आधुनिक औषधशास्त्राचा ब्रिजकोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना आधुनिक औषधे देण्याचे अधिकार तसेच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला आयएमए व मार्ड या ॲलोपॅथी डॉक्टरांच्या संघटनांचा तीव्र विरोध असून त्याविरोधात त्यांनी गुरुवारी संपाची पुकारला होता. परंतु मुंबई उच्च न्यायालयाने डॉक्टरांच्या संपाविषयी अत्यंत कठोर भूमिका घेतल्याने त्यांना संप मागे घेणे भाग पडले. वास्तविक या संपूर्ण विषयाकडे या डॉक्टरांनी व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी आजही तज्ज्ञ डॉक्टरांची मोठी कमतरता आहे. अशा परिस्थितीत अतिरिक्त प्रशिक्षित मनुष्यबळाचा उपयोग करून आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याकडे सरकारचे लोककल्याणाचे प्रयत्न म्हणून पाहिले पाहिजे. प्रशिक्षित आणि कायदेशीर पात्रता पूर्ण केलेल्या डॉक्टरांचा उपयोग सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत अधिक प्रभावीपणे व्हावा असे सरकारचे म्हणणे आहे. त्याचदृष्टीने ज्यांनी सरकारमान्य सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकॉलॉजी पूर्ण केला आहे अशा बीएचएमएस पदवीधारकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणीची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या अभ्यासक्रमाद्वारे संबंधित डॉक्टरांना आधुनिक औषधोपचारांचे प्रशिक्षण देण्यात आले असून त्यामागे ग्रामीण आणि दुर्गम भागात आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळेच राज्यात होमिओपॅथी आणि ॲलोपॅथी नोंदणीच्या प्रश्नावर निर्माण झालेला वाद हा केवळ दोन वैद्यकीय पद्धतींमधील संघर्ष नाही तर राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या सरकारच्या प्रयत्नांशी तो संबंधित आहे. सरकारच्या संबंधित निर्णयाला इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) आणि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड) यांनी तीव्र विरोध दर्शविला असला, तरी या विषयाकडे डॉक्टरांनी केवळ आपल्या व्यावसायिक हिताच्या दृष्टीने नव्हे तर व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आहे. परंतु आयएमए व मार्ड या ॲलोपॅथी डॉक्टरांच्या संघटनांनी सरकारच्या संबंधित निर्णयाला विरोध करत आंदोलन व संपाचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या मते या निर्णयामुळे आधुनिक वैद्यकशास्त्राच्या निकषांवर परिणाम होईल आणि रुग्णांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होऊ शकेल. या संघटनांद्वारे राज्यभरात संप पुकारण्यात आल्याने अनेक सरकारी रुग्णालयांतील सेवा गुरुवारी विस्कळीत झाली. मात्र, या आंदोलनावर मुंबई उच्च न्यायालयाने अत्यंत कठोर भूमिका घेतली. संपामुळे जर रुग्णांचे जीव गेले, तर त्याची भरपाई कोण करणार असे न्यायालयाने स्पष्ट शब्दांत विचारले. डॉक्टरांच्या मागण्या योग्य असोत वा अयोग्य, त्याकरिता उपचारासाठी येणाऱ्या निरपराध रुग्णांना वेठीस धरणे योग्य ठरू शकत नाही असे ठाम प्रतिपादन न्यायालयाने केले. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर नियमित सेवा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला व आंदोलन इतर मार्गांनी सुरू ठेवण्याचा पर्याय स्वीकारण्यात आला. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही संघटनेला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, आरोग्यसेवेसारख्या अत्यावश्यक क्षेत्रात संप हा शेवटचा पर्यायच असला पाहिजे. डॉक्टरांच्या संपाचा परिणाम थेट सामान्य नागरिकांवर होतो याकडे लक्ष वेधून न्यायालयाने चिंता व्यक्त केली. शिवाय राज्य सरकारनेही संबंधित निर्णयासंदर्भात संवादाचे दरवाजे बंद केले नाहीत. त्यामुळे संघर्षाऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारणेच योग्य ठरू शकते. या संपूर्ण वादात अग्रक्रमाने सामान्य रुग्णांचे हितच विचारात घेतले पाहिजे. त्यांना दर्जेदार, सुरक्षित आणि वेळेवर उपचार मिळणे हेच सर्व संबंधितांचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे.

# कायदेशीर ओळखीपलीकडचा सामाजिक बदल!

महाराष्ट्रातील शेतीचा इतिहास लिहायचा झाला तर त्यात महिलांच्या श्रमांची नोंद अपरिहार्य आहे. पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, बीजसंवर्धन, भाजीपाला उत्पादन, शेतीमालाची प्रक्रिया अशा जवळपास प्रत्येक टप्प्यावर महिला वर्षानुवर्षे पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आल्या आहेत. तरीही "शेतकरी" ही ओळख मात्र बहुतेक वेळा जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव असलेल्या व्यक्तीपुरतीच मर्यादित राहिली.




त्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या लाखो महिलांचे योगदान मान्य असूनही त्यांना कायदेशीर दर्जा, आर्थिक हक्क आणि शासकीय योजनांमध्ये समान प्रवेश मिळत नव्हता. परिणामी पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान आणि इतर अनेक शासकीय योजनांपासून त्या वंचित राहत होत्या. ही दरी भरून काढण्यासाठी राज्य शासनाने "महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६" आणण्याचा निर्णय घेतला आहे. हे विधेयक राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातून राज्य शासनाने शेतीत अहोरात्र काम करणाऱ्या महिलांना एक ओळख दिली आहे.

यापुढील काळात कृषी क्षेत्रात यामुळे महिलांचा सहभाग वाढणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेत आणि विधानसभेत 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' हे केवळ नवीन कायदेविषयक पाऊल नाही, तर ग्रामीण समाजरचनेतील एका दीर्घकालीन विसंगतीला उत्तर देण्याचा प्रयत्न आहे. महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची ही संकल्पना कृषी क्षेत्रातील लिंगसमतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकते.महाराष्ट्राने या विधेयकाच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण दिशा दाखविली आहे. पुढील काळात त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यावर लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल पडणार आहे. त्यांच्या श्रमांना सन्मान, हक्कांना कायदेशीर आधार आणि विकास प्रक्रियेत समान सहभाग मिळवून देण्याची क्षमता या विधेयकात आहे.

महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' विधानपरिषदेत आणि विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे. हे विधेयक राज्यातील महिलांसाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांना प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख मिळणार असून, महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने हे विधेयक तयार केले आहे.या विधेयकाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे "शेतकरी" या संकल्पनेचा विस्तार. शेती ही केवळ पिकांच्या उत्पादनापुरती मर्यादित नसून पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग, कृषी वानिकी, सेंद्रिय शेती, मशरूम उत्पादन, वनोपज संकलन आणि इतर पूरक व्यवसाय यांचाही त्यात समावेश आहे, ही वस्तुस्थिती या विधेयकाने स्वीकारली आहे.

यामुळे भूमिहीन, भाडेपट्ट्यावर शेती करणाऱ्या किंवा शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या महिलांनाही प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.आजही ग्रामीण भागात शेतीतील श्रम आणि मालकी यांच्यात मोठी दरी आहे. अनेक महिला दिवसभर शेतात राबतात; परंतु जमिनीची मालकी त्यांच्या नावावर नसल्यामुळे त्यांना पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान, बँक कर्ज किंवा शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. या परिस्थितीत महिला शेतकरी प्रमाणपत्राची संकल्पना महत्त्वाची ठरते. पात्र महिलांना हे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर शासनाच्या विविध कृषी योजनांपर्यंत त्यांची थेट पोहोच निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे महिलांना शेतकरी म्हणून मान्यता मिळाल्याने त्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ होणे शक्य होईल. या निर्णयामुळे पीक कर्ज, पिकांसाठी अनुदान, पीक विमा, बियाणे, खते आणि इतर शासकीय सुविधांचा लाभ त्यांना मिळणार आहे.

विधेयकात महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करण्याची तरतूदही महत्त्वाची आहे. आज अनेक योजना लाभार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत. डिजिटल नोंदणीमुळे योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि लाभांचे वितरण अधिक पारदर्शक व परिणामकारक होण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी, कौशल्य विकास, उद्योजकता, आर्थिक सहाय्य आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच यांसारख्या उपाययोजनांमुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक व्यापक स्वरूपात घडणार आहे.तथापि कोणत्याही प्रगतिशील कायद्याचे यश त्याच्या तरतुदींमध्ये नसून प्रत्यक्ष अंमलबजावणीत असते. अनेक ग्रामीण कुटुंबांमध्ये महिलांचे निर्णयस्वातंत्र्य मर्यादित असते. त्यामुळे केवळ कायदेशीर मान्यता मिळाल्याने सर्व समस्या सुटणार नाहीत. महिलांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे, स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी विभाग, सहकारी संस्था आणि बँकांनी संवेदनशीलतेने काम करणे तसेच समाजातील पारंपरिक दृष्टिकोनात बदल घडविणे हीदेखील तितकीच आवश्यक प्रक्रिया आहे. या विधेयकामुळे महिलांच्या श्रमांना प्रथमच संस्थात्मक मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे.

आजपर्यंत शेतीतील महिलांचे योगदान "कुटुंबातील मदत" म्हणून पाहिले जात होते; आता त्यांना स्वतंत्र उत्पादक, निर्णयक्षम शेतकरी आणि कृषी अर्थव्यवस्थेतील समान भागीदार म्हणून दर्जा मिळेल. हा बदल केवळ आर्थिक स्थैर्य देण्याचा नसून, सामाजिक बदल आहे.शेतीचा कणा मजबूत करायचा असेल, तर त्या कण्याला बळ देणाऱ्या महिलांना केवळ सहकारी नव्हे, तर स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता देणे ही काळाची गरज होती. महाराष्ट्राने त्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. पुढील टप्प्यात या विधेयकाच्या यशासाठी ग्रामपातळीवर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. कृषी विज्ञान केंद्रे, स्वयंसेवी संस्था आणि बचतगटांच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या हक्कांची आणि योजनांच्या अटींची माहिती मिळाली पाहिजे. गावोगावी मदत केंद्रे सुरू झाल्यास प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे, कागदपत्रे जोडणे आणि ऑनलाइन नोंदणी करणे सोपे होईल.

यामुळे तांत्रिक अडचणींमुळे कोणीही लाभापासून वंचित राहणार नाही.या कायद्यामुळे कृषी क्षेत्रात महिलांच्या नेतृत्वाला नवे बळ मिळू शकते. महिला शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी दूध संस्था, कृषी प्रक्रिया उद्योग आणि थेट बाजारपेठ यांच्याशी जोडल्यास त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळेल. कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे आधुनिक शेती तंत्रे, सेंद्रिय शेती, पाणी व्यवस्थापन आणि मूल्यवर्धन या क्षेत्रांत महिलांची भूमिका अधिक सक्षम होईल. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही गती मिळेल आणि स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.सर्वात महत्त्वाचे म्हणजे या बदलामुळे कुटुंबात आणि समाजात महिलांच्या निर्णयक्षमतेला मान मिळेल. शेतीविषयक निर्णय, आर्थिक नियोजन आणि मुलांच्या शिक्षणात त्यांचा सहभाग वाढेल. शेतात राबणाऱ्या प्रत्येक महिलेला आता "मीही शेतकरी आहे" असे अभिमानाने सांगता येईल.

ही ओळखच त्यांच्या आत्मविश्वासाची आणि सामाजिक प्रतिष्ठेची नवी सुरुवात ठरेल. कायद्याने दिलेली संधी आणि समाजाने दिलेला सन्मान यांची सांगड घातली, तर महाराष्ट्रातील शेती खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक आणि समृद्ध होईल.

**–वर्षा फडके-आंधळे,**
**उपसंचालक (वृत्त),**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



## बदलते तंत्रज्ञान

# मोबाईल ते सॅटेलाइटपर्यंत सोन्याचा होतो वापर

सोन्याचा वापर आपल्याकडे फक्त महिलाच करतात. अनेक जण सोन्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात, पण सोन्याचा वापर तुम्ही वापरत असलेल्या मोबाईल, लॅपटॉप यामध्ये केला जातो. सोने हे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञान उद्योगासाठीदेखील खूप महत्वाचे आहे. उपग्रहांपासून स्मार्टफोनपर्यंत अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो.



स्मार्टफोनच्या सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि प्रोसेसरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. लॅपटॉप आणि कॉम्प्युटरच्या मदरबोर्ड, रॅम मॉड्यूल आणि सीपीयूमध्ये सोन्याचा वापर केला जातो. टॅबलेट आणि आयपॅडच्या कनेक्टर आणि इंटीग्रेटेड सर्किटमध्ये सोन्याचा वापर केला जातो.

टेलिव्हिजन सेटच्या सर्किट बोर्ड आणि कनेक्शन पॉइंट्समध्ये सोन्याचा वापर केला जातो. डिजिटल कॅमेऱ्यांच्या अंतर्गत सर्किट्स आणि कनेक्टर्समध्ये खूप कमी प्रमाणात सोने वापरले जाते, पण या उपकरणांमध्ये सोनं कमी प्रमाणात वापरले जाते.

संगणक हार्डवेअरमध्ये अनेक ठिकाणी सोन्याचा वापर केला जातो. मदरबोर्डच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिन आणि कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला आहे. सीपीयूच्या आत सोन्याचा मुलामा असलेल्या पिनमध्ये देखील वापरले जाते.

मोबाईल नेटवर्क टॉवर्समधील उच्च-फ्रिक्वेन्सी कनेक्टरमध्ये सोन्याचा वापर केला जातो. उपग्रह संप्रेषण उपकरणांच्या रिसीव्हर आणि ॲंटेनामध्ये सोन्याचा वापर केला जातो.

वैद्यकीय उपकरणांमध्ये सोने वैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या अनेक उपकरणांमध्ये सोन्याचा वापर केला जातो. यामध्ये पेसमेकर आणि डिफिब्रिलेटरचा समावेश आहे. श्रवणयंत्रांमध्येही सोन्याचा मुलामा असलेले कनेक्टर वापरले जातात. सोन्याचा वापर उच्च संवेदनशील सर्किटमध्ये केला जातो.

सोने हे विजेचे चांगले वाहक आहे आणि ते गंजत नाही. विद्युत सिग्नल प्रसारित करू शकते. सर्व हार्डवेअरमध्ये जलद संवाद साधण्यासाठी सर्किट बोर्ड, कनेक्टर आणि मायक्रोचिप्समध्ये सोन्याचा वापर केला जातो.

अंतराळयान हे एक महागडे वाहन आहे. येथे सोन्याचा वापर वीज वाहक म्हणून आणि अनेक आवश्यक वायरिंगमध्ये केला जातो.

# हरित क्रांतीचे जनक डॉ. एम.एस. स्वामीनाथन

भारतीय अनुवंशशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय प्रशासक आणि कृषी शास्त्रज्ञ डॉ. एम.एस. स्वामीनाथन यांचा आज जन्मदिवस. भारतातील हरित क्रांतीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. कृषीप्रधान देशात कृषी क्षेत्रातील संशोधनासाठी त्यांनी एम.एस.स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनची स्थापना केली. ७ ऑगस्ट १९२५ रोजी तामिळनाडूमधील कुंभकोणम येथे सांबशिवम स्वामीनाथन यांचा जन्म झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. स्वामीनाथन अवघ्या दहा वर्षांचे असताना वडिलांचे निधन झाले. सुरुवातीला वडिलांप्रमाणे स्वामीनाथनसुद्धा डॉक्टरी शिक्षणाकडे वळले, पण त्या वेळी बंगालमध्ये पडलेल्या भीषण दुष्काळामुळे त्यांना दुःख झाले. सुरुवातीपासूनच शेती क्षेत्राची आवड असलेल्या सांबशिवम स्वामीनाथन यांनी डॉक्टरी शिक्षण अर्धवट सोडले. त्यानंतर ते शेतकी विषयाकडे वळले. १९४४मध्ये त्रावणकोर विद्यापीठातून ते बीएससी पदवीधारक झाले. त्यानंतर १९४७मध्ये कोईंबतूर कृषी महाविद्यालयातून त्यांनी कृषी विषयात बीएससीची पदवी मिळवली. १९४९मध्ये स्वामीनाथन यांनी दिल्लीच्या इंडियन ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटमधून विशेष प्रावीण्यासह पदव्युत्तर शिक्षण घेतले. त्यानंतर स्वामीनाथन हे केंद्रीय लोकसेवा




## निमित्त

आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. ते भारतीय पोलीस सेवेसाठीही पात्र ठरले, मात्र त्यांनी पोलीस ऑफिसर न होता कृषी क्षेत्रात संशोधन करण्याचा निर्णय घेतला.

१९५२मध्ये स्वामीनाथन यांनी केंब्रिजच्या ॲग्रीकल्चर स्कूलमधून पीएचडी मिळवली. या वेळी त्यांचा संशोधनाचा विषय बटाटा होता. पदवी मिळवल्यानंतर स्वामीनाथन यांनी शेतीत करिअर करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मद्रासच्या कृषी महाविद्यालयात (आताच्या तामिळनाडू कृषी विद्यापीठात) प्रवेश घेतला. येथे त्यांनी कृषी विषयातील पदवी संपादित केली. कृषी क्षेत्रातील अभ्यासाकडे वळण्याविषयी स्वामीनाथन यांनी एक आठवण सांगितली आहे. १९४३मध्ये केरळ विद्यापीठाचा विद्यार्थी असताना बंगालमध्ये दुष्काळ पडला होता. त्या वेळी प्रत्येकजण देशाच्या स्वातंत्र्यासाठी योगदान देत होता. बंगालमधील दुष्काळातून प्रेरणा घेत देशातील शेतकऱ्यांसाठी कार्य करण्याचा विचार करत त्यांनी कृषी क्षेत्राकडे वळण्याचा निर्णय घेतला. अभ्यासात हुशार असलेल्या स्वामीनाथन यांनी अभ्यासासोबतच खूप कष्ट उपसले. १९४९ ते ५० या कालावधीत त्यांनी नेदरलँड्स विद्यापीठात अनुवंशशास्त्र विभागाचे युनेस्कोचे फेलो म्हणून काम केले. त्यानंतर १९५२ ते ५३ या कालावधीत त्यांनी अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठाच्या अनुवंशशास्त्र विभागात संशोधन सहकारी म्हणून काम केले, पण स्वामीनाथन यांना त्यांच्या संशोधन कार्यात मदत होईल अशा कामाची गरज होती. अशातच आंतरराष्ट्रीय संस्थेत तांदळावर संशोधन करण्याची संधी त्यांना मिळाली.

दरम्यानच्या काळात स्वामीनाथन व सहकाऱ्यांना त्या वेळी भारतात आलेल्या डॉ. व्होरलॉग यांचे मार्गदर्शन लाभले. पुढे देशातील शेतकऱ्यांची दुरवस्था घालवण्यासाठी १८ नोव्हेंबर २००४मध्ये आयोगाची स्थापना करण्यात आली. डॉ. एम.एस. स्वामीनाथन हे या आयोगाचे अध्यक्ष होते. अशा या महान व्यक्तिमत्वाचे २८ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले. (साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



# आरोग्य प्रहर

## बेलाच्या पानांचे जबरदस्त फायदे

श्रावण महिना आला की बेलाच्या पानांना अतिशय महत्त्व प्राप्त होते. श्रावणी सोमवारची पूजा तर बेलाच्या पानांशिवाय अपूर्णच. जोपर्यंत महादेवाच्या पिंडीला बेल वाहिला जात नाही, तोपर्यंत ती पूजा काही पूर्ण होत नाही असे मानले जाते. ज्या वनस्पतींना आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व असते, त्या वनस्पती आपल्याकडे आध्यात्मिक दृष्टिकोनातूनही अतिशय महत्त्वाच्या मानल्या जातात. तुळस, बेल ही काही त्याचीच उदाहरणे. आता श्रावणाच्या महिन्यात बेलाच्या पानांना एवढे महत्त्व का असते ते पाहूया..



डॉ. श्रेय शर्मा यांनी ओन्ली माय हेल्थ यांना दिलेल्या माहितीनुसार बेलाची पानं मधुमेह, लिव्हर, मुत्राशयाचे आजार तसेच पचनक्रिया सुधारण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरतात. बेलाच्या पानांमध्ये ॲंटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे ते ॲंटी कॅन्सर एजंट म्हणून ओळखले जातात. सिडीटी, कॉन्स्टिपेशन, गॅसेस, पोटदुखी असे त्रास कमी करण्यासाठी बेलाची पाने उपयुक्त ठरतात. बेलाच्या पानांमध्ये ॲंटीबॅक्टेरियल आणि ॲंटीफंगल गुणधर्म असल्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठीही त्याचा उपयोग होतो, पण डॉक्टरांच्या सल्ल्यानेच त्याचे सेवन करावे. मनानेच कोणतेही प्रयोग करणे टाळावे.

आरोग्यासाठी जसा बेल उपयुक्त ठरतो, तसाच तो सौंदर्याच्या दृष्टीनेही फायदेशीर ठरतो. त्वचा मऊ, हायड्रेटेड ठेवण्यासाठी बेलाची पाने खूप उपयुक्त ठरतात. त्वचा लालसर होऊन खाज येत असेल किंवा त्वचेवर कोणतेही फंगल इन्फेक्शन झाले असेल तर अशावेळी बेलाच्या पानांचा लेप उपयोगी ठरतो.

ॲक्ने, पिगमेंटेशन आणि पिंपल्स कमी करण्यासाठीही बेलाच्या पानांचा रस लावण्याचा सल्ला दिला जातो. बेलाच्या पानांचा ताजा रस काढून त्यामध्ये तुमच्या सोयीनुसार लिंबू, हळद, बेसन, तांदळाचे पीठ असे वेगवेगळे पदार्थ घालून त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा आणि १० ते १२ मिनिटांनी चेहरा धुवून टाकावा. आठवड्यातून एकदा हा उपाय केल्यास त्वचेमध्ये खूप छान बदल दिसून येईल.

एकूणच आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाणारे बेल आरोग्याच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे.

# उपजिल्हा रुग्णालयात १५पैकी बहुसंख्य तज्ज्ञ पदे रिक्त

## माणगावमध्ये रुग्णांची परवड




**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अपघातग्रस्तांसह दक्षिण रायगड आणि शेजारील रत्नागिरी जिल्ह्यातील हजारो नागरिकांसाठी जीवनदायी ठरणारे माणगाव उपजिल्हा रुग्णालय आज तज्ज्ञ डॉक्टरांच्या अभावामुळे अक्षरशः व्हेंटिलेटरवर असल्याचे चित्र आहे. शासनाने १०० बेडचे रुग्णालय उभारले, अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून दिली, मात्र त्यावर उपचार करणारे तज्ज्ञ डॉक्टरच नसल्याने संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या रुग्णालया साठी १५ कायम स्वरूपी तज्ज्ञ डॉक्टरांची पदे मंजूर असतानाही त्यातील अनेक महत्त्वाची पदे गेली दोन ते तीन वर्षा पासून रिक्त आहेत.

वैद्यकीय अधीक्षक, जनरल सर्जन, स्त्रीरोग तज्ज्ञ, दोन भूल तज्ज्ञ, फिजिशियन, बालरोग तज्ज्ञ, अस्थिरोग तज्ज्ञ, दंत तज्ज्ञ अशी अत्यंत महत्त्वाची पदे अद्याप भरलेली नाहीत. त्यामुळे गंभीर रुग्णांवर वेळेवर उपचार करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. विशेष म्हणजे, शासनाने माणगाव उपजिल्हा रुग्णालयासाठी नेत्र तज्ज्ञाची नियुक्ती केली असली तरी त्यांना महाड उपजिल्हा रुग्णालयात प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे. त्यांचा पगार मात्र माणगावच्या रुग्णालयातूनच दिला जात आहे. त्यामुळे माणगावच्या रुग्णांना नेत्र तज्ज्ञाची सेवा मिळत नाही, ही प्रशासनातील विसंगती नागरिकांच्या रोषाला कारणीभूत ठरत आहे. सध्या अपघात विभागातील ४ सीएमओ पदे केवळ ११ महिन्यांच्या करारावर भरली आहेत. ही पदे कायम स्वरूपी भरण्याची मागणी सातत्याने होत आहे. वैद्यकीय अधीक्षकाचे पदही रिक्त असून, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मेथा यांच्याकडे प्रभारी म्हणून अतिरिक्त जबाबदारी आहे. कायमस्वरूपी नेतृत्व नसल्याने रुग्णालयाच्या कारभारावर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शासनाने आयपीएचएस अंतर्गत काही तज्ज्ञ डॉक्टरांची ऑन-कॉल व अर्धवेळ नियुक्ती करून व्यवस्था उभी केली असली, तरी प्रत्यक्षात रुग्ण दाखल झाल्या नंतर अनेकदा संबंधित डॉक्टर वेळेत उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी रुग्णांच्या नातेवाईका कडून सातत्याने केल्या जात आहेत. अशा परिस्थितीत लाखो रुपयांचे मानधन खर्च करूनही अपेक्षित आरोग्य सेवा मिळत नसल्याने नागरिका मध्ये तीव्र नाराजी आहे. कांही महिन्या पूर्वी येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे या स्वतः फिजिशियन असल्याने हृदयविकारासह गंभीर रुग्णांना चोवीस तास सेवा उपलब्ध होत होती. त्यांच्या बदलीनंतर फिजिशियनचे पद रिक्त झाले असून त्या सेवेचाही मोठा फटका रुग्णांना बसत आहे. आज या रुग्णालयात सिटीस्कॅन, डायलेसिस विभाग, पुरेसा ऑक्सिजन साठा आणि इतर आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. शासनाने कोट्यवधी रुपयांचा खर्च करून पायाभूत सुविधा उभारल्या. मात्र त्यांचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक असलेले तज्ज्ञ डॉक्टरच नसतील, तर या सुविधांचा उपयोग काय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

महामार्गावरील वारंवार होणारे अपघात, दक्षिण रायगडमधील वाढती लोकसंख्या आणि शेजारील रत्नागिरी जिल्ह्यातून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता, माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे केवळ तालुक्यापुरते मर्यादित नसून संपूर्ण परिसरासाठी महत्त्वाचे आरोग्यकेंद्र आहे. खाजगी रुग्णालयातील महागडी उपचारपद्धती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने गरीब व मध्यमवर्गीय नागरिकांचा एकमेव आधार हेच सरकारी रुग्णालय आहे. असे असतानाही वर्षानुवर्षे तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त ठेवणे, प्रभारी कारभारावर रुग्णालय चालविणे आणि करारावरील व्यवस्थेवर आरोग्यसेवा उभी करण्याचा प्रयत्न करणे, हा आरोग्य व्यवस्थेतील गंभीर निष्काळजीपणाच म्हणावा लागेल. नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या परिस्थितीची नैतिक जबाबदारी आरोग्य विभाग आणि लोकप्रतिनिधींनी स्वीकारणार का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. माणगाव सह दक्षिण रायगडच्या जनतेने अनेकवेळा तज्ज्ञ डॉक्टरांची मागणी केली. मात्र आश्वासनांपलीकडे काहीच घडले नाही.

## पळसदरी तलावाजवळ भीषण अपघात; तरुणीचा जागीच मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-खोपोली राज्य मार्गावरील पळसदरी तलावा जवळ आज सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास वॅगनर कार व दुचाकीच्या झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील एका तरुणीचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकी चालक गंभीर जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार ताकई येथील मित्रांचा एक गट साजगाव येथील चालकासह माथेरानच्या दिशेने निघाला होता. त्याचवेळी पळसदरी तलावा जवळील अरुंद आणि अर्धवट अवस्थेतील रस्त्यावर समोरून येणाऱ्या रोहित वाघमारे ( रा. पोशीर - कर्जत) यांच्या दुचाकीची वॅगनरशी जोरदार धडक झाली.

धडक इतकी भीषण होती की दुचाकीवर मागे बसलेल्या अंबरनाथ येथील सोनाली (१६ वर्षे) हिला गंभीर दुखापत होऊन तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर दुचाकी चालक रोहित वाघमारे गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र पळसदरी यांच्या रुग्णवाहिकेने तत्काळ घटनास्थळी पोहोचून कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यामुळे जखमीला तातडीची वैद्यकीय मदत मिळू शकली.

कर्जत-खोपोली मार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याचे काम अद्याप अपूर्ण असून काही ठिकाणी रस्त्याची रुंदी अचानक कमी होते. तसेच इशारा फलक, सुरक्षा बॅरिकेड्स, परावर्तक चिन्हे आणि इतर अत्यावश्यक सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याने या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

## मोरबे धरणाच्या पाण्यात प्लास्टिक बॉटलसह दारूच्या बाटल्या

**चौक : प्रतिनिधी**



मोरबे धरणाच्या पाण्यात प्लास्टिक बिसलेरी बॉटल सहित दारूच्या बाटल्यांचा खच जमा होत असून भविष्यात चिंतेची बाब निर्माण होणार आहे.

खालापूर तालुक्यातील मोरबे धरण हे नवी मुंबई महानगर पालिका संपूर्ण परिसर आणि पनवेल महानगर पालिकेच्या कामोठे व खारघर विभागाला पाणी पुरवठा करत असून रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण आहे. हे धरण नवी मुंबई महानगर पालिका यांच्या मालकीचे आहे. मोरबे धरणाचा संपूर्ण परिसर निसर्ग सुंदर आहे,धरणाच्या उशाला जग प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान आहे, दुर्गम आणि डोंगराळ भागाने धरणाची सुंदरता वाढवली आहे.वर्षाच्या बारा महिने येथे पर्यटक, ट्रेकर्स येत असतात, पावसाळ्यात अनेक आदिवासी वाड्यांच्या दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या पाण्यात अनेक पर्यटक पावसाळी पर्यटनास येत असतात.

पर्यटक येताना बिसलेरी बॉटल, थंड पेयाच्या बॉटल, प्लास्टिक पॅक मधील पदार्थ घेऊन येतात, सोबत दारूच्या बाटल्या असतात, पर्यटकांनी मौजमजा केली की हे सर्व येथील नाल्यात टाकले जाते, अथवा त्याच परिसरात राहिल्याने नाल्याच्या व पावसाच्या पाण्यातून मोरबे धरणात येताना दिसून येत आहे.

धरणाच्या पाण्यात प्लास्टिकच्या बिसलेरी किंवा इतर कंपन्यांच्या बाटल्या टाकल्याने पर्यावरणावर आणि मानवी आरोग्यावर अत्यंत गंभीर दुष्परिणाम होतात.पाण्यात पडलेल्या प्लास्टिकचे ऊन आणि वाऱ्यामुळे बारीक तुकडे (मायक्रोप्लास्टिक) होतात, हे मायक्रोप्लास्टिक शुद्धीकरण प्रक्रियेनंतरही पाण्यात राहू शकते. असे पाणी प्यायल्याने कर्करोग (Cancer), यकृताचे आजार आणि वंध्यत्वाचा धोका वाढतो, असे पर्यावरण प्रेमी आणि माहितीगार यांचे म्हणणे आहे, प्लास्टिकच्या बाटल्यांमधून 'बिस्फेनॉल-ए' (BPA) आणि 'फ्थालेट्स' सारखी विषारी रसायने पाण्यात विरघळतात. यामुळे शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडते. मासे, कासव आणि इतर जलचर प्राणी हे प्लास्टिक चुकून अन्न म्हणून गिळतात. यामुळे त्यांचे अन्ननलिका ब्लॉक होऊन त्यांचा मृत्यू होतो. प्लास्टिक कुजायला शेकडो वर्षे लागतात. त्यामुळे धरणातील पाणी दूषित होते आणि पाण्याचा नैसर्गिक दर्जा खालावतो.हजारो बाटल्या साठल्यामुळे धरणाच्या पाणी साठवण क्षमतेवर परिणाम होतो.धरण किंवा कालव्याच्या दरवाजांमध्ये (Sluice gates) प्लास्टिक अडकून पाणी पुरवठा खंडित होऊ शकतो. हे धरण विस्तीर्ण असल्याने नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

## खोपोली भाजप महिला मोर्चाच्या एसटी बस सवलत कार्ड शिबिराला प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव व पनवेलचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत एसटी बस सवलत कार्डचे वाटप गुरुवारी ज्येष्ठ नागरिक सभागृहात करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिका सभागृह नेते प्रकाश बिनेदार, रायगड जिल्हा भाजपा सरचिटणीस दीपक बेहेरे, पक्षाचे खोपोली प्रभारी सुनील घरत, भाजप क्रीडा विभागाचे शरद कदम, खोपोली भाजप अध्यक्ष अजय इंगुलकर, परिवहन सभापती किशोर पाटील, नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, खोपोली सरचिटणीस विकास खुरपडे, नगरसेविका सानिया शेख , माजी नगरसेवक इंदरमल खंडेलावाल, महिला मोर्चा अध्यक्ष व नगरसेविका अश्विनी अत्रे, दिलीप पवार, सारिका शेटे, राजन शेटे, सुनीती महर्षी, विभा पाठक, साठे मॅडम, व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला मोर्चाच्या अध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्या नेतृत्वाखाली हा एसटी बस सवलत कार्डचे वाटप करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन उपनगराध्यक्ष व युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस विक्रम साबळे यांच्या हस्ते व परिवहन सभापती किशोर पाटील, नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेविका सानिया शेख, अश्विनी अत्रे, व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले

ज्येष्ठ नागरिक सभेचे अध्यक्ष रवींद्र घोडके यांनी प्रास्ताविक भाषणात आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या कार्य शैलीवर अभ्यासपूर्ण विचार मांडले, तसेच कविता सादर करून वाहवा मिळवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रल्हाद अत्रे व भाजप कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न केले. या शिबिराला ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



## टीबीमुक्त १२ ग्रामपंचायतींचा गौरव

**मुरुड : प्रतिनिधी**



केंद्र शासनाच्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२५ मध्ये टीबी मुक्त घोषित झालेल्या मुरुड तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींचा गौरव सोहळा मुरुड पंचायत समिती मधील महाराष्ट्र भुषण आ.डॉ. ति.श्री. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात येथे उत्साहात पार पडला.

यावेळी पंचायत समिती सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम, गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, तालुका आरोग्यअधिकारी डॉ.अक्षय सोळंके, कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ, औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत, विजय वाघमारे, शालीकराव पावरा, मयुर पाटील आरोग्य सेवक राजेंद्र चुनेकर यांच्यासह आरोग्य विभागाचे कर्मचारी, ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन व ग्रामपंचायतींचा सत्कार पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ, उपसभापती अश्विनी जंगम आणि गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ यांच्या हस्ते करण्यात आला सन २०२५ मधील कामगिरीच्या आधारे कोर्लई, नांदगाव आणि वेळास्ते या ग्रामपंचायतींना गोल्ड श्रेणी, मजगाव, साळाव आणि तेलवडे यांना सिल्व्हर श्रेणी, काकळघर, मिठेखार, सावली, तलेखार, वावडूंगी आणि वळके या ग्रामपंचायतींना ब्राँझ श्रेणी या ग्रामपंचायतींना सभापती निलेश घाटवळ, उपसभापती -अश्विनी जंगम व पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्या गौरविण्यात आले.

यावेळी तालुका आरोग्य विभागाने उपस्थितांना 'निक्षयमित्र' बनून क्षयरुग्णांना पोषण व मानसिक आधार देण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत सभापती निलेश घाटवळ व कोर्लई ग्रामपंचायतीच्या सरपंच राजश्री मिसाळ यांनी पाच क्षयरुग्ण दत्तक घेण्याची घोषणा केली.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अक्षय सोळंके यांनी क्षयरोगाची लक्षणे, उपचारपद्धती आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत मार्गदर्शन केले. दोन आठवड्यांपेक्षा अधिक काळ खोकला राहणे, खोकल्यात रक्त येणे, ताप, रात्री घाम येणे, वजन घटणे, छातीत दुखणे आणि भूक न लागणे ही क्षयरोगाची प्रमुख लक्षणे असल्याचे त्यांनी सांगितले. शासकीय रुग्णालयात क्षयरोगाची तपासणी व उपचार मोफत उपलब्ध असून, उपचार नियमित आणि पूर्ण करणे तसेच पौष्टिक आहार घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## नढाळ येथे अपघातात स्कुटीचालक गंभीर जखमी

**चौक : प्रतिनिधी**



जुना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर नढाळ गावाजवळ अपघात होऊन स्कुटी चालक गंभीर जखमी झाला आहे. त्याला तातडीने कामोठे येथे एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जुना-मुंबई पुणे रस्त्यावर नढाळ हद्दीत हायवा गाडी मधाळ आदिवासीवाडीकडून पनवेल दिशेला वळताना चालकाने चौक दिशेकडे जाणार्या स्कुटीकडे दुर्लक्ष केल्याने ती हायवा गाडीला जोरदारपणे धडकली,

ही माहिती चौक पोलिस दूरक्षेत्र येथे मिळताच पोलीस हवालदार मनोहर पाटील व माऊली गर्जे यांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त यांना चौक येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.व अपघातामुळे झालेली वाहतूक कोंडी दूर केली.

स्कुटी चालक याच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने चौक शासकीय रुग्णालयातून त्यांना तातडीने कामोठे येथे एम जी एम रुग्णालयात दाखल केले असून, पुढील तपास चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंगटे करीत आहेत.

## रोहा प्रेस क्लबचा बांधावरील शेतकरी सन्मान उपक्रम ठरला प्रेरणादायी!

**धाटाव : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील कर्तृत्ववान शेतकऱ्यांच्या परिश्रमाला सन्मानाचे व्यासपीठ मिळावे, आधुनिक शेतीला चालना मिळावी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने स्वर्गीय संतोष पवार यांच्या संकल्पनेतून रोहा प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'शेतकरी सन्मान बांधावरील' उपक्रम उत्साहात पार पडला. शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांचा सन्मान करण्याच्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत रोहा-अष्टमी परिसरातील निवी ठाकूरवाडी येथील प्रगतशील शेतकरी, दुर्मिळ वृक्षसंवर्धक व पर्यावरणप्रेमी नितीनदादा पिंपळे यांचा त्यांच्या शेतावर जाऊन विशेष सत्कार करण्यात आला. विविध दुर्मिळ वृक्षांचे संगोपन, पर्यावरण संवर्धन आणि नैसर्गिक शेतीसाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना गौरविण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सामाजिक कार्यकर्ते आप्पा देशमुख, प्रगतशील शेतकरी धनंजय जोशी, संतोष दिवकर, रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष श्याम लोखंडे, संपादक राजेंद्र जाधव, कार्याध्यक्ष नाना खरीवले तसेच रोहा प्रेस क्लबचे पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते.

यानंतर करंजविरा येथील प्रगतशील महिला शेतकरी लीला मोहन मोरे यांचाही त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन गौरव करण्यात आला. रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी करंजविरा ग्रामपंचायतीचे सरपंच बाळाराम मोरे, रोहा प्रेस क्लबचे पदाधिकारी, पत्रकार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी बोलताना मधुकर पाटील म्हणाले की, "रोहा प्रेस क्लबने सुरू केलेला 'शेतकरी सन्मान बांधावरील' हा उपक्रम खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या कष्टांचा गौरव करणारा आहे. अशा उपक्रमांमुळे प्रगतशील शेतकऱ्यांच्या कार्याला योग्य व्यासपीठ मिळते आणि इतर शेतकऱ्यांनाही आधुनिक, तंत्रज्ञानाधारित शेती करण्याची प्रेरणा मिळते."

ते पुढे म्हणाले की, राज्य शासन व रायगड जिल्हा परिषदेमार्फत शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून त्या प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी कृषी विभागास आवश्यक सूचना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेतीला जोडव्यवसायाची जोड मिळाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम बनेल, असे त्यांनी नमूद केले.

## डॉक्टरांच्या संघटनांचे मागण्यांसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अलिबाग : प्रतिनिधी**



राज्यातील आरोग्य व्यवस्थेशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवरून डॉक्टरांचे आंदोलन अधिक तीव्र झाले आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन, निवासी डॉक्टरांची संघटना, राज्य वैद्यकीय इंटर्न्स संघटना तसेच विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या संघटनांनी आंदोलनाला संयुक्त पाठिंबा जाहीर केला आहे.

या पार्श्वभूमीवर इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अलिबाग शाखेतर्फे रायगड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शाखाध्यक्ष डॉ. विनायक पाटील यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांनी शासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

संयुक्त निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासनाशी अनेकदा चर्चा करूनही होमिओपॅथी पदवीधारकांच्या समुदाय वैद्यकीय प्रशिक्षण नोंदणी प्रक्रियेसह निवासी डॉक्टरांच्या सेवा, प्रशिक्षण व कल्याणाशी संबंधित प्रश्नांवर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. स्पष्ट कायदेशीर व नियामक चौकटीचा अभाव आणि शासनाकडून समाधानकारक हमी न मिळाल्याने डॉक्टरांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या प्रश्नांचा थेट परिणाम रुग्णांच्या सुरक्षिततेवर, वैद्यकीय शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि राज्यातील आरोग्यव्यवस्थेवरील जनतेच्या विश्वासावर होईल,असा दावा डॉक्टर संघटनांनी केला आहे.त्यामुळे नियमित व गैर-आपत्कालीन वैद्यकीय सेवा बंद आंदोलनाला संघटनांनी पाठिंबा दिला आहे.


महावितरण

## ई-निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता **टी-०८ (२nd call ), टी-०९ (२nd call), टी-३२ (४th call ), टी-६८, टी-६९, टी-७०, टी-७१, टी-७२, टी-७३, टी-७४, टी-७५, टी-७६, टी-७७, टी-७८, टी-७९, टी-८०, टी-८१, टी-८२, टी-८३, टी-८४, टी-८५, टी-८६, टी-८७, टी-८८ आणि टी-६० (२nd Call) (२०२६-२७)** अशा एकुण पंचवीस निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०७.०८.२०२६ पासून ते दि. १४.०८.२०२६ @१३.०० वाजेपर्यंत** उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १४.०८.२०२६ ला १५.०० वाजेपर्यंत** आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

# पनवेल पालिका स्थायी समिती सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा गुरुवारी (दि. ६) महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. यावेळी स्थायी समिती सदस्य, अतिरिक्त आयुक्त १ गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त २ महेशकुमार मेघमाळे, सचिव नानासाहेब कामठे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त रवीकिरण घोडके, शहर अभियंता राजेश कर्डिले, उपसचिव अक्षय कद, उपमुख्य लेखापरीक्षक संदीप खुरपे, महापालिका अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



पनवेल महानगरपालिकेच्या सल्लागाराची पाच वर्षांकरिता (प्रथम ३ वर्षे व समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षे मुदतवाढ) निवडसूचीचे विस्तार करण्याचा विषय स्थायी समितीमध्ये स्थगित करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भूखंड क्र. ४१४मध्ये प्ले ग्राउंड केंद्र शासनाच्या "भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य २०२२-२०२३" या योजनेच्या अंतर्गत विकसित करणे या कामाच्या कमी व अधिक बाबींना मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-अ, प्रभाग क्र. ०१मध्ये तळोजा फेज-२ ते घोट कोयनावेळे पुलापर्यंत आरसीसी गटाराचे बांधकाम करणे व रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचा विषय समितीमध्ये रद्द करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, कामोठे येथील सेक्टर-१९, प्लॉट नं.१४ येथे शाळा बांधण्याचा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला. पनवेल शहरातील अग्निशमन केंद्राला लागून ते अं.भू.क्र. ४१ पर्यंत डांबरी रस्ता व पावसाळी गटार बांधण्याचा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "ड"मधील विविध ठिकाणी असलेल्या पनवेल महानगरपालिका मालकीच्या सर्व सार्वजनिक शौचालयांची आवश्यकतेनुसार दोन वर्षांसाठी दुरुस्ती व नूतनीकरण करणे या कामाच्या सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीमध्ये स्थगित करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने विकसित केलेल्या नवीन पनवेल (पूर्व व पश्चिम) व काळुंद्रे नोडमधील मलनिःस्सारण वाहिन्यांची दोन वर्षे कालावधीकरिता आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती, सुधारणा व नूतनीकरण करणे या कामाच्या सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थायी समितीच्या बैठकीत स्थगित करण्यात आला. मे. देवीचंद चव्हाण, ठाणे यांच्याकडून अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी अतिरिक्त १११ मनुष्यबळ उपलब्ध करून घेणेकामी कार्यादेश निर्गमितचा विषय स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला.

## रामशेठ ठाकूर वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाच्या

# विद्यार्थ्याची जागतिक कामगिरी

## सिद्धार्थ दासचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये पाच विक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रथम वर्ष बी.कॉम. (मॅनेजमेंट स्टडीज) शाखेचा विद्यार्थी सिद्धार्थ दासने आपल्या अद्वितीय कौशल्य आणि जिद्दीच्या बळावर तब्बल पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आपल्या नावावर नोंदवून महाविद्यालयासह संपूर्ण शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढविला. यापूर्वीच्या विक्रमांबरोबरच सिद्धार्थने आणखी दोन नवीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स प्रस्थापित करत यशाच्या शिखरावर आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.




सिद्धार्थने ३० सेकंदांत १५१ स्किप्स, १ मिनिटात २७४ स्किप्स, ३ मिनिटांत ७११ स्किप्स, ३० सेकंदांत एका पायावर १४३ स्किप्स, ३० सेकंदांत डोळ्यांवर पट्टी बांधून एका पायावर १३७ स्किप्स असे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आपल्या नावावर नोंदविले आहेत ही कामगिरी केवळ वैयक्तिक यश नसून कठोर परिश्रम, सातत्य, चिकाटी आणि ध्येयाप्रति असलेल्या समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

सिद्धार्थच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून इतर विद्यार्थ्यांनाही उच्च ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे. संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे व संस्थेचे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा. डॉ. रीत ठुले व इतर प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सिद्धार्थचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्याच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# टीएनजी विद्यालयात नशामुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम विद्यालय व टीएनजी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक (गुन्हे) अश्विनी पाटील, पोलीस उपनिरीक्षक तुषार बच्छाव, पोलीस हवालदार दीपक पाटील, महिला पोलीस हवालदार वृषाली मोकल आणि रोहिणी जाधव उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक नुकसान तसेच व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही व्यसनाला बळी न पडता निरोगी, सुदृढ व जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनीही या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत व्यसनमुक्त समाज घडविण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमास प्राचार्या सायली वडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्त जीवनाचा संदेश प्रभावीपणे पोहचला आणि 'नशामुक्त भारत' घडविण्याच्या अभियानाला बळ मिळाले आहे.

# गव्हाण विद्यालयाला रोटरी क्लबकडून स्किल लॅब भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हाताला कौशल्य, मनाला आत्मविश्वास आणि भविष्याला नवी दिशा, या संकल्पनेला साकार रूप देणारा एक प्रेरणादायी उपक्रम बुधवारी (दि. ५) श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण-कोपर विद्यालयात संपन्न झाला. रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेलच्या वतीने अत्याधुनिक स्किल लॅब विद्यालयास प्रदान करण्यात आली. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या प्रयत्नांतून आणि डॉ. अनिल परमार यांच्या सहकार्यातून रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेल यांच्या सौजन्याने विद्यालयास स्किल लॅब मिळाली आहे.



रोटरी क्लब ऑफ नवीन पनवेलचे प्रेसिडेंट चंद्रशेखर वाडकर, जिल्हा प्रेसिडेंट डॉ. मीना देव, प्रिन्सिपल ॲडव्हायझर रंजना गाला यांना विद्यालयाच्या वतीने विशेष धन्यवाद देण्यात आले. या स्किल लॅबमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे My Workshop हे आधुनिक सॉफ्टवेअर तसेच इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कारपेंटरी, रांगोळी, मेहंदी, ज्वेलरी डिझाइन, फॅब्रिक फॅशन, प्लंबिंग, रोबोटिक्स, गार्डनिंग आणि ड्रोन प्रात्यक्षिकासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना कौशल्याधारित, अनुभवात्मक व रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. रोटरी क्लबच्या वतीने उपस्थित असलेले विष्णू सर आणि संकेत सर यांनी स्किल लॅबमधील विविध साहित्याचे सविस्तर प्रात्यक्षिक करून दाखवले. विशेषतः कारपेंटरी व इलेक्ट्रिकल विभागातील उपकरणांचा सुरक्षित आणि प्रभावी वापर विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष करून घेतला. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक कृतीला त्यांनी मार्गदर्शन करीत त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन दिले. उपक्रमात इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त आणि सक्रिय सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध उपकरणांचा प्रत्यक्ष वापर करून आनंदाने शिकण्याचा अनुभव घेतला.

त्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह, आत्मविश्वास आणि नव्या कौशल्यांविषयीची जिज्ञासा हा या उपक्रमाचा खरा यशस्वी ठेवा ठरला. कार्यशाळेस विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व ज्येष्ठ शिक्षक रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्याधारित शिक्षणाविषयी विशेष उत्सुकता निर्माण झाली.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख शितलकुमार म्हात्रे, विशांत ठाकूर, प्रशांत परदेशी आणि सारिका ठाकूर यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करणे, प्रत्यक्ष कृतीतून शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि भविष्यकालीन रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणे या दृष्टीने ही स्किल लॅब विद्यालयासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. रोटरी क्लबच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल विद्यालयाने मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

# सीकेटी महाविद्यालयात एनसीसीतर्फे रक्तदान शिबिर; १३६ कॅडेट्स, प्राध्यापकांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी महाविद्यालयात सोमवारी (दि. ३) एनसीसी विभागातर्फे महावीर इंटरनॅशनल आणि रुधीर सेतू संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य तपासणी आणि भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १३६ एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते. शिबिरादरम्यान सर्व कॅडेट्सची वैद्यकीय तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली.

या तपासणीमध्ये रक्तदाब, रक्तातील साखरेची पातळी, संपूर्ण रक्तपेशी मोजणी यांसह इतर आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. तपासणीनंतर पात्र ठरलेल्या कॅडेट्सनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रति आपली जबाबदारी पार पाडली तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही उत्स्फूर्तपणे रक्तदान करून उपक्रमात मोलाचा सहभाग नोंदविला. रक्तदान शिबिराचे आयोजन अनुभवी वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले. रक्तदानाचे महत्त्व, नियमित आरोग्य तपासणी आणि सामाजिक सेवेमध्ये युवकांची भूमिका याविषयी कॅडेट्सना मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, एनसीसी अधिकारी डॉ. नीलिमा तिदार आणि उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे कौतुक करत युवकांनी अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. हा उपक्रम "एकता आणि शिस्त" या एनसीसीच्या ब्रीदवाक्याला साजेसा ठरत समाजसेवेची भावना अधिक दृढ करणारा ठरला. सीकेटीच्या वतीने महावीर इंटरनॅशनल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पोदार तसेच रुधिर सेतू संस्थेचे अध्यक्ष सुरेश रिसबूड यांचे रक्तदान शिबिरासाठी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार प्रकट केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सक्रिय सहभागामुळे उपक्रम यशस्वीपणे पार पडला.



# 'सीकेटी'त कला संघटनेचा उद्घाटन सोहळा : स्पर्धा परीक्षांमधील करिअर संधीवर व्याख्यान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (अधिकार प्रदत्त स्वायत्त), नवीन पनवेल येथील मराठी विभाग आणि कला संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७मधील कला संघटनेच्या उद्घाटन समारंभानिमित्त स्पर्धा परीक्षांमधील करिअरच्या संधी या विषयावरील विशेष व्याख्यानाचे आयोजन १ ऑगस्ट रोजी करण्यात आले. महाविद्यालयाच्या कॉमर्स रिसोर्स सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे बी. डी. काळे, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ईशस्तवन आणि स्वागतगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल, सन्मानचिन्ह, पुस्तक आणि रोपटे देऊन सत्कार केला. प्रास्ताविकात कला शाखा व अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बी. एस. पाटील यांनी कला संघटनेची स्थापना, तिची उद्दिष्टे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक, कौशल्यविकास, व्यक्तिमत्त्व विकास व करिअरभिमुख उपक्रमांची माहिती दिली.



कला संघटना ही विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सर्जनशीलता, प्रभावी संवाद कौशल्य, आत्मविश्वास आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित करणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय कला संघटना व मराठी विभाग प्रमुख प्रा. मा. म. आंबुलगेकर यांनी करून दिला. त्यांनी डॉ. जाधव यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक अनुभवाचा तसेच स्पर्धा परीक्षा क्षेत्रात विद्यार्थ्यांना दिलेल्या उल्लेखनीय मार्गदर्शनाचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. इंद्रजित जाधव यांनी विद्यार्थ्यांनी आयुष्यात स्पष्ट ध्येय निश्चित करून पुस्तकांशी मैत्री करण्याचे, वृत्तपत्रांचे वाचन करण्याचे आवाहन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून नियोजनबद्ध तयारी, सातत्यपूर्ण अभ्यास, चालू घडामोडींचे सखोल ज्ञान, वेळेचे प्रभावी व्यवस्थापन आणि सकारात्मक दृष्टिकोन या यशाच्या गुरुकिल्ल्या असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय व राज्य लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, बँकिंग, रेल्वे, संरक्षण दल, विमा, न्यायव्यवस्था तसेच विविध सार्वजनिक व खासगी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधींची सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार योग्य क्षेत्राची निवड करून आतापासूनच तयारीला सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच संवाद कौशल्य, नेतृत्व, संघभावना, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव विकसित करण्यासाठी कला संघटनेचे विविध उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरतील, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय भविष्यातही अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन सातत्याने करीत राहील, असेही त्यांनी नमूद केले. सूत्रसंचालन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू यांनी केले, तर ग्रामीण विकास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एस. एम. भोईर यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या विशेष व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमधील विविध करिअर संधींची व्यापक माहिती मिळाली तसेच व्यक्तिमत्त्व विकास, ध्येयनिश्चिती आणि भविष्यातील करिअर नियोजनासाठी महत्त्वपूर्ण प्रेरणा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# रोह्यात समाजोपयोगी उपक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपतर्फे विविध कार्यक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्ष रोहा तालुक्याच्या वतीने बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी तालुकाभर विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. या सेवा उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



यावेळी महादेववाडी येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच शैक्षणिक साहित्य व दप्तरांचे वाटप करण्यात आले. रोहा नगर परिषद अष्टमी शाळा क्रमांक ३ मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. परमपूज्य पांडुरंग शास्त्री आठवले धाटाव हायस्कूलला विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी शेगडी भेट देण्यात आली. भाजप शहराच्या वतीने रोहा ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. रोठ खुर्द परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच नगरसेवक तथा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या पुढाकारातून शेतकऱ्यांची ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया मोफत करून देण्यात आली. याशिवाय सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू नागरिकांसाठी मोफत ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

यावेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, नगरसेवक रोशन चाफेकर, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, कामगार मोर्चा तालुकाध्यक्ष संदेश बामणे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष नरेश कोकरे, शहराध्यक्ष सुमित रिसबूड, युवा मोर्चा शहराध्यक्ष अनिल घरजाले, युवा मोर्चा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, युवा मोर्चा चिटणीस संकेत मोरे, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष विकास बामणे, शहराध्यक्ष मृणाल पेंडसे, महिला युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रिया कासार, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, सोशल मीडिया संयोजक निखिल बोरले, युवा मोर्चा सरचिटणीस वैभव कुलकर्णी, जिल्हा सोशल मीडिया संयोजक सनिल इंगावले, प्राजक्ता धुमाळ, तृप्ती बामणे, महिला मोर्चा सरचिटणीस सायली बामणे , सुरेखा कदम मॅडम, रोहा नगरपालिकेचे शिक्षण सभापती सचिन चालके,नगरसेवक प्रशांत कडुं यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग म्हणाले, "लोकनेते आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकास आणि जनसेवा हेच आपल्या सार्वजनिक जीवनाचे ध्येय मानले आहे. सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि गोरगरिबांच्या प्रश्नांबाबत सातत्याने काम करणारे लोकनेते म्हणून त्यांनी जनतेच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा देण्यापेक्षा समाजाला प्रत्यक्ष उपयोगी पडतील असे उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, शेतकरी हित आणि सामाजिक सेवा या क्षेत्रांमध्ये भाजप रोहा तालुका नेहमीच जनतेच्या पाठीशी ठामपणे उभा राहील. आगामी काळातही लोकहिताचे असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील." समाजोपयोगी उपक्रमांच्या या मालिकेमुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा, विकास आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला. विविध स्तरातील नागरिकांनी या उपक्रमांचे स्वागत करून भाजपच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

# खोपोली रोट्रॅक्ट क्लबचा वार्षिक पदग्रहण सोहळा

**खोपोली : प्रतिनिधी**

रोट्रॅक्ट क्लब ऑफ खोपोलीचा सातवा पदग्रहण समारंभ दिनांक २ ऑगस्ट रोजी सहकार नगर भानवाज येथील रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या सभागृहात पार पडला.रोट्रॅक्टर वैष्णव दिनेश फाटक यांनी रोटरी आंतरराष्ट्रीय वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्ष आणि रोट्रॅक्ट वागीश बाहेती यांनी सचिव पदाचा पदभार स्वीकारला.

सदर कार्यक्रमाला रोटरॅक्ट जिल्हा प्रतिनिधी पीएचएफ डीआरआर डॉ करिश्मा आवारी दसारी ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच ह्या वर्षीच्या रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा रोटेरियन कविता खोपकर आणि सचिव रोहित भल्ला हे अतिथी म्हणून उपस्थित होते.

रोटरॅक्ट क्लब ऑफ खोपोलीच्या नवीन सदस्यांना डीआरआर करिश्मा ह्यांनी रोटरॅक्टची शपथ देऊन त्यांचे अभिनंदन केले.रॉटरॅक्टर वैष्णव आणि रोटरॅक्टर वागीश ह्यांच्या सोबत अन्य सदस्यांनी त्यांच्या पदाचा पदभार स्वीकारला.

ह्या कार्यक्रमासाठी रोटरॅक्ट जिल्हा ३१३१ च्या परिषदेवर असलेले जिल्हा सरचिटणीस रो हर्षवर्धन काळे , जिल्हा कार्यक्रम आणि शिष्टाचार सचिव रो दिशा डागा तसेच अन्य सदस्य पुणे येथून उपस्थित होते२०२७-२०२८ ह्या रोटरॅक्ट आंतराष्ट्रीय वर्षासाठी डीआरआर नियुक्त करण्यात आलेला पीएचएफ डीआरआर ॲडव्होकेट सत्यजीत कराळे पाटील उपस्थित होते.



# खोपोलीतील विहारी झेनिथ ठाकूरवाडीमधील युवकांच्या हाती रेस्क्यूची जबाबदारी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुसळधार पाऊस, अंधार आणि अत्यंत कठीण परिस्थितीत विहारी झेनिथ ठाकूरवाडीतील युवकांनी हेल्प फाउंडेशन, पोलीस यंत्रणेच्या खांद्याला खांदा लावून बचावकार्य तसेच खोल दरीतून पर्यटकाचा मृतदेह बाहेर काढण्याच्या मोहिमेत मोलाची भूमिका बजावली.या धाडसी कार्याची दखल खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी घेतली असून युवकांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे. हेल्प फाउंडेशनने या युवकांच्या धाडसाला संघटित दिशा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



खोपोली परिसरातील झेनिथ वॉटर फॉल, केपी वॉटर फॉल आणि इतर नैसर्गिक धबधबे पावसाळ्यात हजारो पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरतात. मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने पर्यटक येथे येत असल्याने दरवर्षी अपघात आणि बचावकार्याची आव्हानेही वाढत आहेत. सोशल मीडियावरील रील्स, व्हिडिओ आणि छायाचित्रांच्या मोहापायी अनेक पर्यटक धोकादायक ठिकाणी जात असल्याने जीवितहानीच्या घटनाही घडत आहेत.

यंदाच्या पावसाळयात पाण्याचा प्रवाह वाढल्याने पर्यटक अडकल्याच्या घटना घडल्या त्यात पार पाडलेल्या बचाव मोहीम आणि विशेषतः २ ऑगस्ट रोजी झालेल्या युवा पर्यटकाचा दरीत कोसळून झालेल्या दुर्दैवी मृत्यूच्या घटनेने स्थानिक युवकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले.या उपक्रमांतर्गत विहारी झेनिथ ठाकूरवाडी व परिसरातील युवकांना आपत्ती व्यवस्थापन, रेस्क्यू तंत्र, दोरखंडाचा सुरक्षित वापर, प्राथमिक उपचार आणि आपत्कालीन प्रतिसाद यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचबरोबर रेस्क्यू मोहिमेसाठी आवश्यक सुरक्षा साधने, गणवेश आणि मूलभूत साहित्य उपलब्ध करून देण्याचाही संकल्प करण्यात आला आहे.

या संकल्पाची पहिली पायरी म्हणून हेल्प फाउंडेशनच्या वतीने स्थानिक युवकांना रेस्क्यू ऑपरेशनसाठी आवश्यक प्राथमिक सुरक्षा साहित्याचे वितरण करण्यात आले. हेल्प फाउंडेशनचे सुनील पुरी, सौरभ घरत, योगेश औटी आणि निखिल ढोले यांच्या हस्ते हे साहित्य नारायण निरगुडे, कुमार ढुमने, प्रकाश निरगुडे, राकेश भगत, अक्षय जाधव,सचिन भगत आणि विहारी झेनिथ ठाकूरवाडीतील ग्रामस्थानी स्वीकारले.

हेल्प फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आपत्ती घडल्यानंतर पोलीस, अग्निशमन दल किंवा इतर शासकीय यंत्रणा घटनास्थळी पोहोचेपर्यंतचा सुरुवातीचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा असतो. या काळात प्रशिक्षित स्थानिक युवक सुरक्षित पद्धतीने प्राथमिक बचावकार्य सुरू करू शकले, तर अनेक मौल्यवान जीव वाचू शकतात. याच उद्देशाने युवकांना टप्प्याटप्प्याने अत्याधुनिक प्रशिक्षण आणि अधिक सक्षम रेस्क्यू साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू राहणार आहेत.

विहारी झेनिथ ठाकूरवाडीतील युवकांमध्ये समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि धाडस आहे. त्या ऊर्जेला योग्य दिशा देत प्रशिक्षित, शिस्तबद्ध आणि सुसज्ज स्वयंसेवकांची स्थानिक फळी उभी करणे, हा हेल्प फाउंडेशनच्या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

भविष्यात पोलीस प्रशासन, महसूल विभाग, खोपोली नगरपालिका, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि स्थानिक युवक यांच्या समन्वयातून उभारला जाणारा हा उपक्रम खोपोली परिसरातील पावसाळी पर्यटन अधिक सुरक्षित करण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# नगरपंचायतीची विद्युतदाहिनी मोजतेय शेवटची घटका!

## माणगावमध्ये शासकीय निधी गेला वाया

**माणगाव : प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक अंत्यसंस्काराची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी माणगाव नगरपंचायतीने केंद्र व राज्य शासनाच्या योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेली विद्युतदाहिनी तब्बल पाच वर्षांपासून बंद अवस्थेत पडून आहे. अत्याधुनिक सुविधा म्हणून उभारण्यात आलेला हा प्रकल्प आज धूळ, गंज आणि निष्क्रियतेच्या विळख्यात अडकला असून शासनाच्या निधीची अक्षरशः राखरांगोळी झाल्याचे चित्र समोर आले आहे.

शहरातील नागरिकांना लाकडावरील पारंपरिक अंत्यसंस्काराला पर्याय म्हणून आधुनिक, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध व्हावी, वृक्षतोड कमी व्हावी तसेच अंत्यसंस्कार प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी या उद्देशाने विद्युतदाहिनीची उभारणी करण्यात आली होती. मात्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेतच हा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडला आणि अखेर पूर्णपणे बंद पडला.

या प्रकल्पाबाबत तत्कालीन नगराध्यक्ष, नगरसेवक आणि अनेक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी विद्युतदाहिनी तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे आजही हा प्रकल्प सुरू होऊ शकलेला नाही. परिणामी आत बसविण्यात आलेली महागडी यंत्रसामग्री धूळ खात पडली असून अनेक भागांवर गंज चढला आहे. तांत्रिक यंत्रणा निकामी होण्याच्या मार्गावर असल्याने पुन्हा ती कार्यान्वित करण्यासाठी मोठा अतिरिक्त खर्च करावा लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याबाबत माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा दूरध्वनीद्वारे तसेच लेखी पत्रव्यवहार करून काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र त्याने अद्यापही काम पूर्ण केलेले नाही.

दरम्यान, या प्रकरणाची अधिक माहिती घेतली असता संबंधित ठेकेदार हा बाहेरील जिल्ह्यातील असून, काम पूर्ण होण्यापूर्वीच त्याला बहुतांश बिलाची रक्कम अदा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उर्वरित काम पूर्ण करण्यास तो सातत्याने टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे.



**खोपोली : महाराष्ट्र प्रदेश भाजप सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष तथा उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या माध्यमातून मिल आदिवासीवाडीत ताडपत्री वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष साबळेंसह, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, जिल्हा व्यापारी संघाचे संजय तन्ना, सोनाली राक्षे यांच्यासह युवा मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

# आयुष हॉस्पिटल, भारतीय तटरक्षक दलातर्फे अलिबागमध्ये मच्छीमार बांधवांसाठी आरोग्य शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील नांदगाव आयुष हॉस्पिटल व भारतीय तटरक्षक दल यांच्या संयुक्त विद्यमाने आरसीएफच्या हॉलमध्ये मोफत आरोग्य शिबिर व सामुदायिक जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाला पोलिस अधीक्षक आंचल दलाल,आयुष हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ.अनिल गोस्वामी, भारतीय तटरक्षक दलाचे कमांडिंग अधिकारी जयदीप पॉल मान्यवर उपस्थित होते. पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांच्याहस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या शिबिरादरम्यान आरोग्य जनजागृती, निरोगी जीवनशैली, रोगप्रतिबंध, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व तसेच वैयक्तिक आरोग्य समुपदेशन करण्यात आले तसेच जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक सर्जरी, दंतचिकित्सा तसेच इतर विविध तज्ज्ञ विभागांतील डॉक्टरांनी सहभाग घेत नागरिकांना सर्वसमावेशक आरोग्यसेवा दिली.

तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला तसेच गरजेनुसार मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा मच्छीमार कुटुंबांनी१५० शिबिराचा लाभ घेतला.

# माणगाव तालुका प्रेस क्लबतर्फे आदर्श शेतकरी पुरस्कारांचे वितरण

**माणगाव : बातमीदार**

रायगड प्रेस क्लब संलग्न माणगाव तालुका प्रेस क्लबच्या वतीने आयोजित 'आदर्श शेतकरी पुरस्कार २०२६' सोहळा बुधवार, ५ ऑगस्ट रोजी गांगवली (मोकाशीवाडी) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती थोरले शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



यावेळी आदर्श शेतकरी म्हणून विजय दाखिणकर, वैभवी दाखिणकर, रामदास धाडवे आणि शैला धाडवे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाला माणगावचे प्रांताधिकारी संदीपान सानप, जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे, माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, उपसभापती मनिषा मालोरे, पंचायत समिती सदस्य अक्षय जाधव, गांगवली ग्रामपंचायतीच्या सरपंच वैशाली जाधव, पोस्को कंपनीचे अधिकारी कुलदीप पुरंदरे तसेच कृषी अधिकारी जगदीश पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मार्गदर्शन करताना सभापती विलास शिंदे म्हणाले की, "शेतकरी हा देशाचा खरा पोशिंदा आहे. कोणत्याही संकटाला न घाबरता तो स्वतःचे कर्तव्य पार पाडत संपूर्ण देशाच्या अन्नसुरक्षेची जबाबदारी निभावतो. पारंपरिक शेतीबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व इतर शेतीपूरक व्यवसाय स्वीकारल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो. कोकणात शेतीचे प्रमाण कमी होत असताना शेतकरी टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे."

जिल्हा परिषद सदस्य अविनाश नलावडे यांनी शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. प्रांताधिकारी संदीपान सानप यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शेतकऱ्याची अथक मेहनत आणि शेतीला पूरक व्यवसायांची जोड हीच यशस्वी शेतीची गुरुकिल्ली आहे. पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेले शेतकरी इतरांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या कार्याचा आदर्श इतरांनी घ्यावा."

या कार्यक्रमाचे आयोजन माणगाव तालुका प्रेस क्लबने केले होते.

# गुरुकुल अकॅडमीची राष्ट्रीय स्पर्धेत छाप



**महाड : प्रतिनिधी**

हरियाणा येथे आयोजित १३व्या स्टुडंट्स ऑलंपिक नॅशनल गेम्स २०२६ स्पर्धेत महाड येथील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट संचलित गुरुकुल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत एकूण १४ पदकांची कमाई केली आहे. यात प्रत्येकी चार सुवर्ण आणि रौप्य तसेच सहा कांस्यपदकांचा समावेश आहे.

श्रद्धा राजेंद्र सावंत, कनिष्का संजय साळुंखे, यश अशोक दासगावकर आणि

## ■ १४ पदकांची कमाई

सार्थक सुभाष मोरे यांनी सुवर्णपदक; रक्षदा राकेश भंडारी, सचिन मोरे, आर्यन सुहास कोतकर आणि देवांक्ष दुर्गेश पारटे यांनी रौप्यपदक; तर प्रांजल प्रफुल्ल धोंडगे, अपूर्वा प्रदीप कलगुडे, विभा विश्वास शिरके, स्वरीत योगेश ताडकर, रूद्र प्रवीण जाधव आणि अनिकेत किशोर गोठल यांनी कांस्यपदक जिंकले. पदक विजेत्या खेळाडूंचे हिरवळ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी कौतुक व अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत मानव पटेल प्रथम

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन आणि ओम साई कॅरम क्लब उरण यांच्या सहयोगाने करंजा येथील द्रोणागिरी देवी मंदिर सभागृहात नुकतेच जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय स्पर्धेत जिल्ह्यातील ११२ स्पर्धकांनी स्पर्धेत भाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी दोन दिवस जेवणाची व्यवस्था भाजप शहराध्यक्ष कौशिक शहा यांनी केली होती.

प्रथम क्रमांक मानव पटेल (कामोठे), द्वितीय आशिष देशमाने (पनवेल), तृतीय अश्रफ खान (पनवेल) आणि चतुर्थ क्रमांक राजेश गोहिल (कामोठे) यांनी पटकाविला.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे पदाधिकारी वैभव वाईगडे, वैभव पेठे, अमित यादव, विराज नाखवा, हरेश नाखवा, तेजस म्हात्रे, नितीन वाघेला आणि सभासदांनी परिश्रम घेतले.

# डॉ. विनय सांगळेंची क्रिकेटमध्ये चमक

**कर्जत : प्रतिनिधी**

मलेशिया येथे नुकत्याच झालेल्या हॉस्पेक्स आंतरराष्ट्रीय मेडिकल क्रिकेट स्पर्धेत मुंबईच्या मेडस्केप स्पार्टन्स युनायटेड संघाने विजेतेपद पटकावले. यामध्ये कर्जतचे सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. विनय सांगळे यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

या स्पर्धेत कतार, बांगलादेश, मलेशिया तसेच भारतातील मुंबई, दिल्ली, केरळ आणि गोवा येथील नामांकित मेडिकल क्रिकेट संघांनी सहभाग नोंदविला होता. चुरशीच्या अंतिम सामन्यात मेडस्केप स्पार्टन्स युनायटेड संघाने गोवा संघाचा पराभव करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या यशाबद्दल डॉ. सांगळे यांच्यासह संघातील इतर खेळाडूंचे अभिनंदन करण्यात येत आहे.



























**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासह भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉच्या भव्य मूट कोर्टचे उद्घाटन आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झाले. या सोहळ्यास आमदार महेश बालदी, संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, शकुंतला ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, महापौर नितीन पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे आदी मान्यवर उपस्थित होते.**
















सौजन्य : श्री. सुरेश पाटील (अध्यक्ष : जेएनपीए जनरल कामगार संघटना)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com